# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ०६/ २०१२** **दिनांक २८.०४.२०१२**

**स्थळ - शिर्डी कार्यालय** **वेळ-दुपारी ३.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शनिवार दिनांक २८.०४.२०१२ रोजी दुपारी ३.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात (साईनिवास अतिथीगृहात) आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं. एसएसएस-वशी-०४-४०५/४०६-२०१२, दिनांक २७ एप्रिल,२०१२ रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आले होते.

त्यानुसार सदरहू सभा शनिवार दिनांक २८.०४.२०१२ रोजी दुपारी ३.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहात मा.अध्यक्ष श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.डॉ.संजीवकुमार, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य
०३. श्री.किशोर मोरे, कार्यकारी अधिकारी, सदस्य

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

यानंतर विषय पत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरू करणेत आली.

**विषय नं.०१** **साईआश्रम -१ व साईआश्रम -२ या इमारतीचे खोल्या /हॉलचे नंबर प्लेटबाबत.**

**प्रस्ताव-** साईआश्रम - १ व साईआश्रम - २ चे बांधकाम पूर्ण होत असून सदर इमारतीमधील खोल्या / हॉल हे साईभक्तांना उपलब्ध करुन द्यावयाच्या आहेत. सदर इमारतीतील खोल्या व हॉलचा तपशील खालील प्रमाणे-

**अ) साईआश्रम :- ०१ खोल्या ( A-Block Bldgs- १२ Nos):-**

| अ.नं | तपशील | ब्लॉकची संख्या | एका ब्लॉकमधील खोल्यांची संख्या | एकूण खोल्यांची संख्या | एकूण मजले | एका खोलीत भक्तांची संख्या क्षमता | निवासक्षमता (भक्तांची संख्या) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | A,B,C,D,E,F,G इमारती (EWC) | ०७ | १२८ | ८९६ | तळमजला +३ (G+३) | ३+२= ५ | ७६८० |
| ०२ | H,I,J,K,L इमारती (IWC) | ०५ | १२८ | ६४० | | | |
| | एकूण | १२ | | १५३६ | | | |

**ब) साईआश्रम :- २ हॉल (B-Block-Bldgs- ०६ Nos)**

| अ.नं | तपशील | ब्लॉकची संख्या | एका ब्लॉकमधील हॉलची संख्या | एकूण हॉलची संख्या | एकूण मजले | एका खोलीत भक्तांची संख्या क्षमता | निवासक्षमता (भक्तांची संख्या) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | A,B,C,D,E,F इमारती | ०६ | ३२ | १९२ | तळमजला +३ (G+३) | ५+२०= २५ | ४,८०० |
| | एकूण | ०६ | | १९२ | | | |

साईआश्रम- १ या बारा इमारतीमध्ये एकूण १५३६ खोल्या व साईआश्रम - २ या सहा इमारतीमध्ये एकूण १९२ हॉल आहेत. सर्व इमारतीचे खोलीचे दरवाजावर व हॉलचे दरवाजावर नंबर प्लेट बसविणे आवश्यक आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे

| तपशील | एकूण इमारतीसाठी याप्रमाणे नंबर | एकूण इमारती | एकूण खोल्या/ हॉल | अंदाजे प्रती नग दर रुपये पैसे | एकूण रक्कम रुपये पैसे |
|---|---|---|---|---|---|
| साईआश्रम- १ | A–01 To A–128 याप्रमाणे B,C, D,E, F,G, H,I,J,K,L पर्यंत | १२ इमारती | १५३६ खोल्या | १२५=०० | १,९२,०००=०० |
| साईआश्रम- २ | A३०१ To A३३२ याप्रमाणे B,C,D,E,F, पर्यंत | ०६ इमारती | १९२ हॉल | १२५=०० | २४,०००=०० |
| | **एकूण** | **१८** | **१७२८** | **१२५=००** | **२,१६,०००=००** |

सदर नंबर प्लेट अॅल्युमिनियम सिटमध्ये साईज लांबी ५ इंच x रुंदी २.५ इंच मध्ये फ्रोस्टिंग स्क्रु फिटींगसह प्रतीनगास दर अंदाजे रु. १२५/- प्रमाणे एकूण १७२८ नगासाठी रु.२,१६,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख सोळा हजार ) खर्च अपेक्षित आहे.

सदर प्रस्ताव व खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयासाठी सादर.

**निर्णय क्र.३६०** **यावर सविस्तर चर्चा होऊन,प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे साईआश्रम -१ व साईआश्रम -२ या इमारतीचे खोल्या /हॉलसाठी १७२८ नंबर प्लेट तयार करुन बसविणेस व याकामी येणारे रक्कम रुपये २,१६,०००/- मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,व्दारावती निवासस्थान)

---

**विषय नं.०२** **साईआश्रम -१ व साईआश्रम -२ कॅन्टीन कॉन्ट्रॅक्ट पद्धतीने चालविणेस देणेकामी जाहीरात प्रसिद्धीस प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईआश्रमचे काम पूर्ण होत आले असून लवकरच भक्तांच्या वास्तव्यासाठी रुमचा वापर सुरु करण्यात येणार असल्यामुळे भक्तांच्या प्राथमिक गरजा भागविता याव्यात म्हणून तेथे कॅन्टीन सुरु करुन भक्तांना चहा, कॉफी, नाष्टा जेवण पुरविणे गरजेचे आहे.

साईआश्रम ०१ व ०२ सुरु करावयाचे असल्याने तेथील सर्व कामे बाहेरील एजन्सीकडून करुन घेण्याचे ठरले आहे. निर्णयात म्हटलेप्रमाणे पंचवटी ग्रुप, नाशिक, कामत ग्रुप, नाशिक, वुडलँड शाहु, सिन्नर व भगत ताराचंद या नामांकित हॉटेल व्यवसायिकांकडून आयटम वाईज रेट मागवावे, असे ठरले होते. मात्र दि.१७/०४/२०१२ रोजीचे मा.का.अ. सो., यांचे कार्यालयातील मिटींग मध्ये कॅन्टीन शिर्डी व शिर्डी परिसरातील नामांकित रेस्टॉरंट चालकांकडून योग्य दरात चालविता येईल, असे ठरले, कॅन्टीन सकाळी ३ वाजता सुरु करुन प्रथम चहा, कॉफी, दूध नंतर नाष्टा पदार्थ ज्युस, थंड पदार्थ इत्यादींचा समावेश करता येईल. चहा नाष्टा सकाळी ११ वाजेपर्यंत चालू ठेवता येईल. त्यानंतर दुपारी १२ ते ०३ यावेळेत भक्तांसाठी योग्य दरात जेवण देण्याचे प्रयोजन करता येईल. सायंकाळी ४ वाजता पुन्हा चहा, कॉफी, दुध सायंकाळी ७ वाजेपर्यंत करता येईल. त्यानंतर रात्रीचे जेवण चालू करता येईल.

जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/३८५०/२०११ दिनांक २६/११/२०११ अन्वये कॅन्टीनमध्ये खालील खाद्य पदार्थ ठेवणेबाबद खरेदी विभागाने कळविले आहे.

| अ.नं. | तपशिल (महाराष्ट्रीयन( | अ.नं. | तपशिल (साऊथ इंडियन) |
|---|---|---|---|
| ०१ | वडा/पाव खोबरा चटणीसह हिरवी तळलेली मिरचीसह | ०१ | इडली-सांबर-चटणी (दोन इडली) |
| ०२ | पाव वडा - चटणीसह | ०२ | मसाला डोसा - सांबर, चटणीसह |
| ०३ | मिसळ पाव | ०३ | प्लेन डोसा - सांबार, चटणीसह |
| ०४ | रसा वडा - मटकीसह | ०४ | मेंदू वडा - सांबार, चटणीसह |
| ०५ | शिरा | ०५ | दही वडा - आचारसह |
| ०६ | कांदा पोहा | ०६ | उपमा - चटणी |
| ०७ | कांदा - भजी - अखंड मिरचीसह | ०७ | मुग डोसा - खोबरा चटणी |
| ०८ | बटाटा भजी - अखंड चटणीसह | ०८ | लेमन राईस - दहीसह |
| ०९ | पूरी भाजी (बटाटा मटकी) | ०९ | हंडी राईस - आचारसह |
| १० | व्हेजिटेबल फ्लावर - दही व आचारसह | ११ | पांगल (राईस) / शिरा /उत्ताप्पा |

वरील पदार्थ देतांना त्याची नियमावली करुन त्याचे वजन / दर ठरविता येईल, बाहेरील दरांपेक्षा माफक दरात साईआश्रम मधील भक्तांना चहा, नाष्टा, जेवण देता यावे म्हणून त्यातील काही खर्च संस्थान मार्फत करता येईल. उदा. फर्निचर, स्टीलचे कॅबीन, कुपन काऊंटर, गॅस पाईप लाईन व मेनफोल्ड इक्युपमेंट इत्यादी संस्थान मार्फत पुरविता येतील.

तरी साईआश्रम ०१ व ०२ मधील कॅन्टीन ठेकेदारास चालविण्यास देवून त्यांचे मार्फत मुख्य कॅन्टीनमध्ये चहा, कॉफी, नाष्टा, थंड पदार्थ, सिलबंद पिण्याचे पाणी, ज्यूस, जेवण इत्यादीं सर्व इमारतींमध्ये तसेच पार्कीग परिसर इत्यादी ठिकाणी पुरविण्याचा ठेका देणेकामी प्रशासकीय मंजुरी मिळणेस व मंजुरी नंतर निविदा विक्री करणेचे विषयावर मा.व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३६१** **यावर सविस्तर चर्चा होऊन,प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे साईआश्रम ०१ व ०२ या इमारतींमध्ये तसेच इमारतीचे पार्किंग परिसरामध्ये ठेकेदारास कॅन्टीन चालविण्यात द्यावी या इमारतींमध्ये वास्तव्य करणाऱ्या साईभक्तांना बाहेरील दरांपेक्षा माफक दरात चहा,कॉफी,दूध,नाष्टा,थंड पदार्थ,पिण्याचे पाणी,ज्यूस इ.पुरविणेचा ठेका देणेसाठी वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिद्ध करुन निविदा मागविण्यात याव्यात.**

**कॅन्टीनसाठी जागा,फर्निचर,कॅबिन,कुपन काऊंटर,गॅस पाईप लाईन व मेनफोल्ड इक्विपमेंट इ.संस्थानमार्फत पुरविण्यात यावे. तसेच कॅन्टीनमध्ये भक्तांना पुरविण्यात येणाऱ्या सर्व वस्तुचे/पदार्थाचे दर संस्थानने ठरवून द्यावेत, असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,व्दारावती निवासस्थान/अधिक्षक,साईप्रसाद निवासस्थान)

---

**विषय नं.०३** **साईआश्रम प्रकल्पातील भाग ०१ व ०२ येथील खोल्या/ हॉलमध्ये कपडे वाळविणेसाठी एस.एस. पाईप बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी व शिर्डी साई ट्रस्ट यांचे सयुक्त विद्यमाने साईआश्रम प्रकल्पाचे बांधकाम अंतीम टप्प्यात आहे. शिर्डी साई ट्रस्ट यांचे मार्फत इमारतींचे बांधकाम देणगीदाखल करण्यात येत आहे व प्रकल्पातील परिसर विकासाचे काम संस्थान मार्फत करण्यात येत आहे.

साई आश्रम प्रकल्प सुरु करणेचे दृष्टीने सर्व संबंधित खातेप्रमुखांची नियोजन आढावा बैठक मा. कार्यकारी अधिकारी सो., यांनी दि.१७/०४/२०१२ रोजी आयोजीत केलेली होती. सदर बैठकीत साई

आश्रम भाग-१ व २ येथे खोल्या/ हॉलमध्ये भक्तांना त्यांचे कपडे वाळविण्यासाठी रॉड बसविण्याचे सूचविले आहे. सदर ठिकाणी २० एम. एम.व्यासाचे एस. एस. पाईप बसविता येतील.

त्यानुसार एस.एस.पाईप खरेदी व फिटींगसाठी खालील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | तपशिल | एकूण खोल्या/हॉल ची संख्या | एकूण एस.एस. पाईपची लांबी | अंदाजे दर प्रती रनिंग मिटर | एकुण अपेक्षित खर्च रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | साई आश्रम-भाग-I (खोल्या) २० एम.एम.व्यासाचा व १.५ एम.एम. जाडीचा एस.एस. पाईप - १.५ मीटर लांब | १५३६ | २३०४ मीटर | २८०/- प्रती र.मीटर | ६,४५,१२०/- |
| ०२ | साई आश्रम-भाग-II (हॉल) २० एम.एम.व्यासाचा व १.५एम. एम. जाडीचा एस.एस. पाईप - ८.४ मीटर लांब | १९२ | १६१३ मीटर | २८०/- प्रती र.मीटर | ४,५१,६४०/- |
| | | | | **एकुण रक्कम रुपये** | **१०,९६,७६०/-** |

उपरोक्तप्रमाणे साई आश्रम भाग-१ व भाग- २ येथील खोल्या/ हॉलमध्ये कपडे वाळविण्यासाठी एस.एस.पाईप बसविणेकरीता रक्कम रु.१०,९६,७६०/-मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. तरी सदर खर्चास व पाईप पुरवठा व फिटींग करणे कामासाठी वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे निविदा मागविणेकरीता मा. त्रिसदस्यीय समितीचे प्रशासकिय मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.३६२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे साई आश्रम भाग-१ व भाग- २ येथील खोल्या/ हॉलमध्ये कपडे वाळविण्यासाठी एस.एस.पाईप बसविणेकरीता रक्कम रु.१०,९६,७६०/- मात्र चे खर्चास मान्यता देण्यात आली. याकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०४** **साईआश्रम -२ हॉलमध्ये लॉकर, कपडे वाळवणे मटेरियल खरेदीकामी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३६३** **याबाबत उपरोक्त निर्णय क्र. ३६२ अन्वये चर्चा होऊन निर्णय झालेला आहे.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०५** **साईआश्रम प्रकल्पातील भाग-२ येथील हॉलसाठी कॉटस् खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** **अ)**मा.व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयांन्वये साई आश्रम प्रकल्पातील खोल्या/ हॉलमध्ये भक्तांसाठी उपलब्ध करुन दयावयाचे एम. एस. (सी.आर.सी.ए) फ्रेम स्ट्रक्चरसह ५५६८ नग सिंगल बेडस् (कॉटस्) साठी विहित पध्दतीने वृत्तपत्रात जाहिरात देऊन सिलबंद निविदा मागविणेत आल्या होत्या. मा. व्यवस्थापन समितीचे दि.२४ जुलै, २०११ रोजीचे सभेत याकामी प्राप्त झालेल्या ०४ सिलबंद निविदा उघडून इच्छुक निविदासादरकर्त्या संस्थेच्या प्रतिनिधींशी चर्चा-वाटाघाटी करुन मे. स्पेसवूड फर्निशर्स प्रा.लि.,नागपूर यांची रु.४,०००/- मात्र (अक्षरी रुपये चार हजार मात्र) प्रती नग (कॉट) या निम्नतम दराची निविदा स्वीकारणेत आली. त्यानुसार मे. स्पेसवूड फर्निशर्स प्रा.लि., नागपूर यांना दि.०९/०८/२०११ रोजी कार्यादेश देणेत आला असून निविदा अटी शर्तीनुसार दि.२२/०८/२०११ रोजी याकामी पुरवठादार यांचेशी करारनामाही करणेत आलेला आहे. मे.स्पेसवूड, नागपूर यांनी कॉटचा पुरवठा पूर्ण केलेला आहे.

**ब)**मे. स्पेसवूड फर्निशर्स प्रा.लि.,नागपूर यांना दिलेला कार्यादेशानुसार प्रकल्पासाठी खालीलप्रमाणे कॉटस् समाविष्ट करण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | तपशिल | एकूण खोल्या / हॉल | एका रुम/ हॉल मधील कॉटची संख्या | कॉटची संख्या | मंजूर दर प्रती नग | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | साई आश्रम- भाग-I | १५३६ | ०३ | ४६०८ | ४०००/- | १,८४,३२,०००/- |
| ०२ | साई आश्रम-भाग-II | १९२ | ०५ | ९६० | ४०००/- | ३८,४०,०००/- |
| | | | | ५५६८ कॉटस् | एकूण रु. | २,२२,७२,०००/- |

साई आश्रम भाग-II येथे २० गाद्या व ०५ कॉट असे एकूण २५ भक्त विश्रांती करु शकतील अशी व्यवस्था एका हॉलमध्ये नियोजीत आहे. एकूण ४८०० भक्तांची निवासव्यवस्था साईआश्रम भाग-२ येथील इमारतींमध्ये होणे अपेक्षित आहे.

साई आश्रम प्रकल्प सुरु करणेचे दृष्टीने सर्व संबंधित खातेप्रमुखांची नियोजन आढावा बैठक मा. कार्यकारी अधिकारी सो., यांनी दि.१७/०४/२०१२ रोजी आयोजीत केलेली होती. सदर बैठकीत साई आश्रम भाग-२ (निमगांव- को-हाळे गट नं.१७२) येथे भक्तांना हॉलमध्ये फ्लोअर बेड ऐवजी कॉटस् उपलब्ध केल्यास हॉलची साफ सफाई करणे, गाद्या स्वच्छ ठेवणे आदि सोयीचे होईल अशी चर्चा झाली. त्यानुसार साईआश्रम भाग-२ येथील सहा B- Block इमारतींपैकी ०५ B- Block इमारतींमध्ये एम. एस.

(सी.आर.सी.ए) फ्रेम सिंगल बेड व ०१ B- Block इमारतीमध्ये एम. एस. (सी.आर.सी.ए) फ्रेम बंक बेड ठेवण्याचे ठरले आहे. त्यानुसार लेआऊट प्लॅन तयार करणेत आलेला आहे व त्यानुसार ०५ B- Block चे १६० हॉल्समध्ये एकूण २८८० भक्तांची निवासाची सोय होऊ शकेल व ०१ B - Block (बंक बेड सुविधाअसलेले) चे ३२ हॉल्समध्ये एकूण ८९६ भक्तांची निवासाची सोय होऊ शकेल.

पुर्वीचे मंजुरीनुसार भाग -०२ करीता एका हॉलमध्ये ५ कॉटस् गृहीत धरुन ९६० नग कॉटस् खरेदी करण्यात आलेले आहेत. आता प्लोअर मॅट्रेसऐवजी निवासाकरीता येणाऱ्या सर्व भक्तांसाठी सिंगल कॉटस व त्यापैकी एका इमारतीतील ३२ हॉलमध्ये बंक बेडसची व्यवस्था करणेसाठी वाढीव कॉटस व बंक बेडस खरेदीकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | तपशिल | ब्लॉकची संख्या | एकूण हॉलची संख्या | एका हॉलमधील वाढीव कॉटची संख्या | एकूण वाढीव कॉटची संख्या | अंदाजे दर प्रती नग | एकुण अपेक्षित खर्च रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | साई आश्रम भाग-II (हॉल) एम.एस.सिंगल कॉटस् | ०५ | १६० | १२ | १९२० नग | ५०००/- प्रती नग | ९६,००,०००/- |
| ०२ | साई आश्रम भाग-II (हॉल) बंक बेड कॉटस् | ०१ | ३२ | १४ | ४४८ नग | २०,०००/- प्रती नग | ८९,६०,०००/- |
| | **एकुण रक्कम रुपये** | | | | | | **१,८५,६०,०००/-.** |

तरी वरीलप्रमाणे रक्कम रु.१,८५,६०,०००/- मात्रचे खर्चास व कॉटस व बंक बेडस खरेदीसाठी वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे निविदा मागविण्यासाठी मा. त्रिसदस्यीय समितीचे प्रशासकिय मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.३६४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे साईआश्रम प्रकल्पातील भाग-२ येथील हॉलसाठी कॉटस् खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात. याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,८५,६०,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०६** **साईआश्रम प्रकल्पातील भाग-२ येथील हॉलसाठी लॉकर्स खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी व शिर्डी साई ट्रस्ट यांचे सयुक्त विद्यमाने साईआश्रम प्रकल्पाचे बांधकाम अंतीम टप्प्यात आहे. शिर्डी साई ट्रस्ट यांचे मार्फत इमारतींचे बांधकाम देणगीदाखल करण्यात येत आहे व प्रकल्पातील परिसर विकासाचे काम संस्थान मार्फत करण्यात येत आहे.

साई आश्रम प्रकल्प सुरु करणेचे दृष्टीने सर्व संबंधित खातेप्रमुखांची नियोजन आढावा बैठक मा. कार्यकारी अधिकारी सो., यांनी दि.१७/०४/२०१२ रोजी आयोजीत केलेली होती. सदर बैठकीत साई आश्रम भाग-२ (निमगांव- कोऱ्हाळे गट नं.१७२) येथे भक्तांना त्यांचे साहित्य सुरक्षित ठेवण्यासाठी हॉलमध्ये लॉकर्स सुविधा पुरविण्याचे ठरले आहे. सोबत प्लॅन माहितीस्तव-तथा आवलोकनार्थ जोडला आहे.

साईआश्रम भाग -०२ मधील सहा B - Block इमारतीसाठी एकूण ५७६ नग लॉकस युनिट खरेदी करावे लागणार आहेत. एका युनिटमध्ये ०६ लॉकर्सची व्यवस्था होईल. त्यानुसार लॉकर्स खरेदीसाठी खालीलप्रमाणे तक्त्यात दर्शविलेप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | तपशिल | ब्लॉकची संख्या | एकूण हॉलची संख्या | एकूण लॉकर्स युनिटची संख्या | अंदाजे दर प्रती नग | एकुण अपेक्षित खर्च रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | साई आश्रम भाग-II (हॉल) एम.एस.लॉकर्स | ०६ | १९२ | ५७६ नग | १८,०००/- प्रती नग | १,०३,६८,०००/- |
| | **एकुण अपेक्षित अंदाजे खर्च रक्कम रुपये** | | | | | **१,०३,६८,०००/-** |

उपरोक्तप्रमाणे साई आश्रम भाग-२ चे हॉलसाठी एकूण ५७६ नग लॉकर्स युनिट (३४५६ नग लॉकर्स) खरेदी करावे लागणार आहेत. तरी त्यासाठी येणारे रक्कम रु.१,०३,६८,०००/-मात्रचे अंदाजे अपेक्षित खर्चास व वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे निविदा मागविण्यासाठी मा त्रिसदस्यीय समितीचे प्रशासकिय मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.३६५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे साई आश्रम भाग-२ चे हॉलसाठी एकूण ५७६ नग लॉकर्स युनिट (३४५६ नग लॉकर्स) खरेदीकामी येणारे अंदाजे रक्कम रु.१,०३,६८,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. याकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०७ साईआश्रम प्रकल्पातील भाग- १ व २ चे आर- ब्लॉक इमारतीतील उपगृहासाठी किचन व इतर अनुषंगिक व्यवस्था करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई आश्रम भाग १ व २ या भक्तनिवास इमारतींचे बांधकाम पूर्णत्वाचे मार्गावर असून सदर इमारती लवकरच साईभक्तांचे निवासाकरीता उपलब्ध करण्यात येणार आहेत. श्री साई आश्रम भाग १ व २ या दोन्ही ठिकाणी R-Block इमारतींमध्ये पहील्या मजल्यावर प्रत्येकी २४० व्यक्ती इतक्या आसनक्षमतेचे व ४१४ चौरस मीटर चटईक्षेत्र असलेले उपहारगृह (dining area) व त्यास संलग्न २१४ चौरस मीटर चटईक्षेत्र असलेले किचन (cooking and service area) यांचे बांधकाम करण्यात आलेले आहे. सदर ठिकाणी साईभक्तांना जेवण व नाष्ट्याची सोय उत्कृष्ट प्रकारे उपलब्ध होणेकामी अत्याधुनिक किचन इक्विपमेंटसह कॅन्टिन सुरु करावयाची आहे.

मा.कार्यकारी अधिकारी सो. यांनी श्री साईआश्रम सुरु करणेसाठी चालू असलेल्या कामकाजाचा आढावा घेणेकामी मा.उप कार्यकारी अधिकारी, प्रशासकीय अधिकारी व सर्व संबंधित अधिक्षक / खातेप्रमुख यांची आढावा बैठक दि.१७.४.२०१२ रोजी घेतली. सदर बैठकीतील चर्चेनुसार Kitchen Equipments खरेदी करण्याची प्रक्रीया श्री.अमृत जगताप व श्री.शिरोळे, प्रसादालय यांनी श्री.आहेर, उप मुख्य अभियंता यांचे मार्गदर्शनाखाली करावी, असे ठरले आहे.

त्यानुसार संपुर्ण कॅन्टिन किचन सेट- अप करणेसाठी त्रुटी विरहीत कार्यवाही होणेकरीता तज्ञ सल्लागार नियुक्त करणे आवश्यक आहे. त्यासाठी किचन सल्लागार म्हणुन कार्यरत असलेल्या खालील तज्ञांना पत्र देवून त्यांना साईट व्हिजीट करणेस बोलावुन त्यांचेकडुन सविस्तर प्रस्ताव सिलबंद पाकिटात मागविता येईल. त्यानंतर प्राप्त प्रस्ताव मा.त्रिसदस्यीय समिती सभेपुढे सादर करुन चर्चा/वाटाघाटीद्वारे सल्लागाराची नियुक्ती करता येईल.

१. सौ. शरली संतोष जोरी, पुणे
२. श्री. किरण मांजरेकर, मुंबई
३. श्री. दिवाकर डी. अमीन, मुंबई

वरीलप्रमाणे किचन सेटअप साठी प्रामुख्याने खालिल Kitchen Equipments / Systems यांची खरेदी व उभारणी करावी लागणार आहे.

१. Cooking equipments.
२. Utensils washing and storage system.
३. Cutting and working tables.
४. Refrigerators.
५. Raw material storage racks / cupboards.
६. Air ventilation/exhaust system.
७. LPG piping.
८. LPG cylinder manifold system with shed.

श्री साईआश्रम १ व २ येथील कॅन्टीन कंत्राटी पद्धतीने चालविणेस देणेकामी संबंधित क्षेत्रातील तज्ञांचा सल्ला घेऊन Tender Document तयार करणेची कार्यवाही कॅन्टीन विभागामार्फत करणेत येणार आहे. वरीलप्रमाणे Kitchen Equipments / Systems यांचे खरेदी व उभारणीसाठी प्राथमिक ढोबळ अंदाजानुसार **रु.१ कोटी ९० लक्ष मात्र** इतका खर्च अपेक्षित आहे. याबाबतचे सविस्तर तपशिलवार अंदाजपत्रक तज्ञ सल्लागार यांचेकडून तयार करुन घेता येईल. तरी सदरहु खर्चास व उपरोक्त तज्ञांकडून सिलबंद पाकिटात मानधनासह प्रस्ताव मागविणेसाठी मा. त्रिसदस्यीय समितीचे प्रशासकीय मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.३६६ यावर सविस्तर चर्चा होऊन, किचन कन्सल्टंट नेमणेकामी मुंबई,पुणे येथील वर्तमानपत्रात जाहिरात देऊन सिलबंद पाकीटात अनुभव व अपेक्षित मानधनासह प्रस्ताव मागविण्यात यावेत असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,साईप्रसादालय/बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०८ साईआश्रम -१ व साईआश्रम-२ मधील खोल्या हॉलमध्ये किटकनाशक फवारणी (पेस्ट कंट्रोल) करणेसाठी जाहिरात देणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईआश्रम भाग १ व भाग २ चे बांधकाम पूर्ण होत असून सदर इमारती मधील खोल्या/हॉल हे साईभक्तांना उपलब्ध करुन द्यावयाच्या आहेत.

साईआश्रम-१ मध्ये अंदाजे ७,६८० व साईआश्रम-२ मध्ये अंदाजे ४,८०० भक्त असे दोन्ही मिळून १२,४८० इतक्या साईभक्तांची निवासव्यवस्था होणार आहे.

साईआश्रम- १ या विभागातील १२ इमारती व साईआश्रम - २ या विभागातील ०६ इमारती मधील खोल्या / हॉल, टॉयलेट, बाथरुम व स्टोअर रुम इत्यादीचे एकूण क्षेत्रफळ याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

### अ) साईआश्रम १ :-

| अ.नं. | तपशील | संख्या | एकूण क्षेत्रफळ (चौ.फुट) |
|---|---|---|---|
| ०१ | १२ इमारतीमधील एकूण खोल्या | १५३६ | २,८७,२३२.०० |
| ०२ | १२ इमारतीमधील एकूण टॉयलेट | १५३६ | २०,४४६.७२ |
| ०३ | १२ इमारतीमधील एकूण बाथरुम | १५३६ | २९,७३६.५६ |
| ०४ | १२ इमारतीमधील एकूण स्टोअर रुम | ९६ | १२,०८७.४९ |
| ०५ | कार्यालयीन इमारतीमधील टॉयलेट | १२ | २३२.३२ |
| | | एकूण | ३,४९,७३५.०९ |

### ब) साईआश्रम - २

| अ.नं. | तपशील | संख्या | एकूण क्षेत्रफळ (चौ.फुट) |
|---|---|---|---|
| ०१ | ०६ इमारतीमधील एकूण हॉल | १९२ | १,३१,३२८.०० |
| ०२ | ०६ इमारतीमधील एकूण टॉयलेट | ६२४ | ९,०४८.०० |
| ०३ | ०६ इमारतीमधील एकूण बाथरुम | ४८० | ९,२९२.०० |
| ०४ | ०६ इमारतीमधील एकूण स्टोअर रुम | ४८ | ८,०८२.०० |
| ०५ | कार्यालयीन इमारतीमधील टॉयलेट | १२ | २३२.३२ |
| | | एकूण | १,५७,९८२.३२ |

सन २०१२/१३ या एक वर्षाचे कालावधीसाठी साईआश्रम- १ व साईआश्रम - २ सुरु होईल तेंव्हा पासुन इमारतीमधील खोल्या / हॉल , टॉयलेट , बाथरुम व स्टोअरचे पेस्ट कंन्टोल करणेबाबत ( किटकनाशक फवारणी) कामाकाजाचे अटी/ शर्ती निविदेमध्ये उल्लेख करुन, निविदा विक्रीस ठेवाव्या लागतील. तसेच संबंधीत ठेकेदाराने निविदा भरल्यावर, निविदेतील अटी शर्तीची पुर्तता करणा-या पात्र निविदाधारकास मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने कार्यादेश देता येईल.

तरी सदरकामी दैनिक वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यास, तसेच साईआश्रम - १ व साईआश्रम - २ या दोन्ही विभागाची एकत्र एकच निविदा विक्री करुन मागविणे बाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३६७ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे साईआश्रम -१ व साईआश्रम-२ चे इमारतींमधील सर्व खोल्या/हॉल, टॉयलेट,बाथरुम, स्टोअर्समध्ये किटकनाशक फवारणी (पेस्ट कंट्रोल) करणेसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,व्दारावती निवासस्थान विभाग)

---

**विषय नं.०९ साईआश्रम प्रकल्प पॅकेज- २ इमारतीचे प्लंबींग कामाचे टेस्टींग करणेकामी पाणी पुरवठा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** प्रकल्प सल्लागार डॉर्श कन्सल्टंट प्रा.लि. यांनी दि.२९/०३/२०१२ रोजीचे मेलव्दारे साईआश्रम प्रकल्पाचे सल्लागार डॉर्श कन्सल्टंट प्रा.लि., यांचे इंजिनिअर श्री.विनोद शिरसावडे यांनी साई आश्रम प्रकल्प-२ करीता बांधण्यात आलेल्या पाण्याचे टाक्यामध्ये पाण्याचा साठा नसल्याने तसेच प्रकल्पाचे ठिकाणी पाण्याची उपलब्धता नसल्यामुळे पाणी टेस्टींगचे काम ठेकेदार पार्श्वनाथ बिल्डर्स लि., यांना करता आले नाही. करीता सदरहू पाण्याचे टाकीमध्ये पाणी साठविणेकामी पाणी उपलब्ध करणेबाबत कळविले आहे.

श्री साई आश्रम प्रकल्प पॅकेज-२ मधील पिण्याचे टाकीमध्ये पाण्याचा पुरवठा करणेकामी जवळचा पर्याय म्हणून संस्थानने खरेदी केलेल्या गट नं. १८२ पैकीचे क्षेत्रातील विहीर आहे. सदर विहीरीतून साई आश्रम पॅकेज-२ चे अंतर हे १४०० मी. आहे. सदर विहीरीत सध्या मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध असून सदर विहीरीतून पाणी उचलून पी.व्ही.सी. पाईप सायफनव्दारे साई आश्रम पॅकेज दोनचे पाण्याचे टाकीत पाणी साठविता येईल. सदरहू पाईपलाईन साईगार्डनकडे जाणारे रस्त्याचे कडेने नेता येईल. याकामी ४" व्यासाचे नामांकित कंपनीचे पी.व्ही.सी. पाईप वापरता येईल. सदर सायफन करणेकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| **अ.नं.** | **कामाचा तपशिल** | **परिमाण** | **एकक** | **दर** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | जे.सी.बी. मशिनव्दारे ३ फुट खोली पर्यंत नाली खोदणे व पाईप टाकल्यानंतर नाली पूर्ववत बुजविणे | ५० | तास | ६००/- | ३०,०००/- |
| ०२ | ४" व्यासाचे पाईप टाकणे | १४०० | र.मी. | १००/- | १,४०,०००/- |
| ०३ | मजुरामार्फत पाईप फीटींग करणे | १५ | कामगार | ४००/- | ६०००/- |
| | एकूण रुपये | | | | १,७६,०००/- |
| | अधिक ५% कन्टेनजन्सीज | | | | ८,८००/- |
| | एकूण | | | | १,८४,८००/- |
| | **पूर्णांकीत रुपये** | | | | **१,८५,०००/-** |

उपरोक्तप्रमाणे गट नं. १८२ मधील विहीरीपासून साई आश्रम प्रकल्पाचे पॅकेज २ पर्यंतचे पाण्याचे टाकीपर्यंत पी.व्ही.सी. पाईपमधिल पाईपलाईन टाकणेकामी १,८५,०००/- मात्र अंदाजे खर्च येणार असून सदर काम पाणीपुरवठा विभागामार्फत करुन घेता येईल.

तरी सदरचे काम पाणी पुरवठा विभागामार्फत करणेकामी व येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३६८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम प्रकल्प पॅकेज- २ इमारतीचे प्लंबींग कामाचे टेस्टींग करणेकामी गट नं. १८२ मधील विहीरीपासून साई आश्रम प्रकल्पाचे पॅकेज २ पर्यंतचे पाण्याचे टाकीपर्यंत पी.व्ही.सी. पाईपमधिल पाईपलाईन टाकणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,८५,०००/- मात्र चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभगाप्रमुख/पाणीपुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.१०** **दिनांक ०१.०५.२०१२ रोजी मौजे शिर्डी येथे मा.लोकनायक अण्णा हजारे यांचे जाहिरसभेसाठी संस्थानचे साईनगर मैदान वापरास परवानगी बाबत**

**प्रस्ताव-** दि.०१/०५/२०१२ रोजी लोकनायक श्री आण्णासाहेब हजारे यांची लोकपाल व लोकआयुक्त विधेयक बाबत मार्गदर्शन करण्यासाठी राज्याचा दौरा दि.०१/०५/२०१२ पासून सुरु करीत आहे.पहीली सभा साईबाबांच्या पावन भुमीत साईबाबांचे आशिर्वाद घेऊन शुभारंभ करण्याचे ठरले आहे.सदर कार्यक्रम हा कोणत्याही राजकीय पक्ष व्यक्ती किंवा जातपात धर्माविरुध्द नाही.केवळ देशातील नागरीकांचे लोकशिक्षण व लोकजागृती हा एकमेव दौ-याचा उददेश आहे.

सदर सभेस दि.०१/०५/२०१२ रोजी शिर्डी येथील साईनगर (साईबाबा संस्थान पटांगण ) येथे पाणी,लाईट,व स्टेजची परवानगी मिळावी .सदर सभा सायंकाळी ६.०० वाजता होणार आहे.परवानगी देण्याबाबत आपण दोन दिवसात निर्णय कळविल्यास आम्हाला याबाबत नियोजन करणे सोपे होईल ही विनती.

मा.व्यवस्थापन मंडळाच्या दि.१८/१०/२००८ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्रं.८०५ मध्ये " येथुन पूढे साईनगर मैदान कोणत्याही खाजगी व राजकीय प्रकारच्या कार्यक्रमास भाडोत्री देण्यांत येऊ नये "असे ठरले.

मा.व्यवस्थापन मंडळाच्या निर्णयानुसार सन २००८ पासू खालील कार्यक्रमासाठी साईनगर मैदान वापरासाठी परवानगी देण्यांत आलेली आहे/ नाकारलेली आहे.

| अ.नं | कार्यक्रमाचे स्वरुप | कार्यक्रमाची तारीख/मुदत | परवानगी दिलेबाबत/नाकारलेबाबत व्यवस्थापन मंडळाचा निर्णय |
|---|---|---|---|
| १ | बहूजन समाज पार्टीचे जन चेतना आंदोलन सभा | दि.५.११.२००८ | १८/१०/२००८,निर्णय क्रं.८०५ नुसार साईनगर मैदान कोणत्याही खाजगी व राजकीय प्रकारच्या कार्यक्रमास भाडोत्री देऊ नये असे ठरले.परवानगी नाकारली. |
| २ | ह.भ.प.रामरावजी महाराज ढोक,तुलसी रामायण कार्यक्रम | दि.७/३/२००९ ते १४/०३/२००९ अखेर ८ दिवस | दि०७/११/२००९ निर्णय क्रं.९१६सदर कार्यक्रम धार्मीक स्वरुपाचा असल्याने विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात यावी असे ठरले. |
| ३ | श्री भोलानाथ शुक्ला, लखनौ,याचां भागवत कथा कार्यक्रम | दि.१७/११/२००९ ते २५/११/२००९ अखेर ९ दिवस | दि०७/११/२००९ निर्णय क्रं.९१६सदर कार्यक्रम धार्मीक स्वरुपाचा असल्याने विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात यावी असे ठरले. |
| ४ | शिलधी प्रतिष्ठान,शिर्डी गुढीपाढवा (मराठी नववर्ष) | २६/३/२००९ | दि.२४/५/२००८ रोजीचे निर्णय क्र.४७९ अन्वये शिर्डी गावातील सार्वजनिक कार्यक्रमासाठी साईनगर परीसरात सेवाआकार घेऊन मोकळे मैदान दयावे व विजपुरवठा करण्यांत यावा.त्यानुसार सेवाआकार रु.२०००/-घेण्यात आलेला आहे. |
| ५ | शिलधी प्रतिष्ठान,शिर्डी गुढीपाढवा (मराठी नववर्ष) | १६/३/२०१० | दि.२४/५/२००८ रोजीचे निर्णय क्र.४७९ अन्वये शिर्डी गावातील सार्वजनिक कार्यक्रमासाठी साईनगर परीसरात सेवाआकार घेऊन मोकळे मैदान दयावे व विजपुरवठा करण्यांत यावा.त्यानुसार सेवाआकार रु.२०००/-घेण्यात आलेला आहे. |
| ६ | श्री साईसगम प्रतिष्ठाण साईभजनसंध्या कार्यक्रम | ३०/०१/२०११ | दि.५/१२/२०१० विषय क्रं.२६ नुसार साईभजन संध्या या धार्मीक कार्यक्रमासाठी एक विशेष बाब म्हणून गतवर्षीप्रमाणे साईनगर मैदान देण्यात यावे असे ठरले. |
| ७ | श्री साईबाबाचे जीवनावरील नाटक कर दो दुखोका अंत है मेरे साई | दि.२.२.११ व ४.२.११ | दि.१३.२.११ निर्णय क्रं.७१ "कार्यक्रमाची तारीख होऊन गेल्याने सदरहू विषय वगळण्यात यावा" असे ठरले. |
| ८ | शिलधी प्रतिष्ठान,शिर्डी गुढीपाढवा (मराठी नववर्ष) | ३/४/२०११ | दि.२४/५/२००८ रोजीचे निर्णय क्र.४७९ अन्वये शिर्डी गावातील सार्वजनिक कार्यक्रमासाठी साईनगर |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | परीसरात सेवाआकार घेऊन मोकळे मैदान दयावे व विजपुरवठा करण्यांत यावा.त्यानुसार सेवाआकार रु.२०००/-घेण्यात आलेला आहे. |
| ९ | ५३ वा सव्वाकरोड शिवलिंग निर्माण महारुद्र यज्ञ | ०९/०५/२०११ ते १५/०५/२०११ | डि.१२/०६/२०११ विषयक्रं.५ नुसार निर्णय क्रं.३४२(९) नुसार दि.९/५/२०११ ते १५/५/२०११ या कालावधीसाठी साईनगर मैदान व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था संस्थान मार्फत मोफत देण्यांत यावी. |
| १० | साईभजन संध्या व श्री साई लक्ष्मी यज्ञ | १४/०१/२०१२ व १५/०१/१२ | दि.२४/०५/२००८ चे सभेतील निर्णश क्रं.४७९ नुसार शिर्डी गावांतील सार्वजनिक कार्यक्रमासाठी साईनगर परीसरात रिकाम्या असलेल्या जागेत आयोजीत करणेस व त्या कार्यक्रमासाठी संस्थानमार्फत वीजपुरवठा देण्यांत येऊन जागेचे भाडे व विद्युत आकार घेण्यांत यावा असे ठरले. |
| ११ | शिलधी प्रतिष्ठान,शिर्डी गुढीपाढवा (मराठी नववर्ष) | २२/३/२०१२ | दि.२४/५/२००८ रोजीचे निर्णय क्र.४७९ अन्वये शिर्डी गावातील सार्वजनिक कार्यक्रमासाठी साईनगर परीसरात सेवाआकार घेऊन मोकळे मैदान दयावे व विजपुरवठा करण्यांत यावा.त्यानुसार सेवाआकार रु.२०००/-घेण्यात आलेला आहे. |

सदर कार्यक्रमासाठी संस्थानचे साईनगर मैदान वापरण्याची परवानगी देणेसंदर्भात खालील बाबी विचारात घ्याव्या लागतील.

१) रु २,०००/-मात्र सेवाआकार आकारुन साईनगर मैदान वापरास परवानगी देता येईल

२) पाण्याची व्यवस्था उपलबध सोईनुसार संस्थानमार्फत विनामुल्य करता येईल.

३) सदर कार्यक्रमासाठी स्टेज व विदयुत पुरवठयाची व्यवस्था आयोजस करावी लागेल.

४) कार्यक्रमास लागणा-या नगरपंचायत,पोलीस स्टेशन,इ कडील परवानग्या आयोजकाने घ्याव्यात.

५) सदर कार्यक्रमाचे वेळी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी आयोजकावर राहील.

**निर्णय क्र.३६९** **यावर सविस्तर चर्चा होऊन साईनगर परिसरात संस्थान कर्मचाऱ्यांची निवासस्थाने व श्री साईबाबा हॉस्पिटल आहे. साईनगर मैदानात कार्यक्रमास परवानगी दिल्यास कार्यक्रमाचे लाऊड स्पिकरचे आवाजाने श्री साईबाबा हॉस्पिटलमधील रुग्णांना त्रास होतो. याकरीता येथून पूढे साईनगर मैदान संस्थानचे कार्यक्रमाव्यतिरिक्त कोणासही वापरण्यास देण्यात येऊ नये .**

**तसेच मा.व्यवस्थापन मंडळाच्या दि.१८/१०/२००८ चे सभेत निर्णय क्रं.८०५ मध्ये " येथुन पूढे साईनगर मैदान कोणत्याही खाजगी व राजकीय प्रकारच्या कार्यक्रमास भाडोत्री देण्यांत येऊ नये " असे ठरले आहे याचे काटेकोर पालन करण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

---

**विषय नं.११** **दोन्ही रुग्णालयासाठी तज्ञ वैद्यकीय अधिकारी, आर.एम.ओ व सी.एम.ओ ची पदे भरणेकामी दिनांक १८.०४.२०१२ रोजी घेण्यात आलेल्या मुलाखतीचे इतिवृत्त.**

**प्रस्ताव-** संस्थानचे दोन्ही रुग्णालयांकरीता तज्ञ वैद्यकिय अधिकारी, आर एम ओ, व सी एम ओ आदि. पदे भरणेकामी दि. ०८/०३/२०१२ रोजीचे इंडियन एक्सप्रेस व लोकसत्ता या वर्तमान पत्रामध्ये वॉक इन इंटरव्ह्युव्हची जाहीरात प्रसिध्द करुन दि. १९/०३/२०१२ रोजी मा. वैद्यकीय उपसमितीसमोर मुलाखती घेण्याचे निश्चित करण्यात आले होते. परंतु, काही कारणास्तव सदरच्या मुलाखती घेण्याची कार्यवाही स्थगीत करण्यात आली होती.

त्यानंतर दि. १२/०४/२०१२ रोजीचे टिपणीनुसार दि. १९/०३/२०१२ रोजी व त्यापुर्वी / त्यानंतर आलेले अर्जदार उमेदवारांच्या दि. १८/०४/२०१२ रोजी श्री साईनिवास अतिथीगृह (मिटींग हॉल) येथे सकाळी ११.०० वाजता खालील प्रमाणे गठीत करणेत आलेल्या समितीचे समोर मुलाखती घेण्याचे नियोजन करण्यात आले होते.

| | |
|---|---|
| १. श्री. किशोर आर. मोरे | कार्यकारी अधिकारी व सदस्य, त्रिसदस्यीय समिती |
| २. डॉ. एन.एस.म्हस्के | प्र. वैद्यकिय संचालक, रुग्णालये |
| ३. डॉ. कौशिककुमार मकवाना | प्र. वैद्यकिय अधिक्षक, श्री साईनाथ रुग्णालय |
| ४. डॉ. एस.जी. गंदगे | प्रोफेसर हेड ऑफ रेडिओलॉजी रुरल मेडिकल कॉलेज, लोणी |
| ५. डॉ. विनायक नेर्लीकर | व्हिजीटींग तज्ञ आर्थो सर्जन, नाशिक |
| ६. डॉ. आर. व्ही. प्रभाकरराव | वरिष्ठ भुलतज्ञ, श्री साईबाबा हॉस्पिटल |
| ७. डॉ. प्रितम जपे | आर्थो सर्जन, श्री साईबाबा हॉस्पीटल. |

उपरोक्त उपस्थित मान्यवरांसमोर मुलाखतीस हजर असलेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आलेल्या आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

| अ नं | पदाचे नाव | भरावयाची पदसंख्या | मुलाखतीस आलेले अर्ज संख्या | मुलाखतीस हजर उमेदवाराचे नाव | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ |
| १ | UROSURGEON | ०१ | ०० | -- | -- |
| २ | PEDIATRICIAN | ०१ | ०० | -- | -- |
| ३ | M O (Orthopaedic Surgeon) | ०२ | ०६ | १) डॉ. गोपाल महादेव शिंदे, नाशिक | एमबीबीएस-१९९७ एम एस (आर्थो)-२०१० फेलोशिप इन आर्थोप्लास्टी-२०११ ट्युबेरटॉमी ट्रेनिंग-१९९९ |
| | | | | २) डॉ. राजेश उत्तम राजुळे, नाशिक | एमबीबीएस-२००३ एम एस (आर्थो)-२००८ |
| ४ | OPHTHALMOLOGIST | ०१ | ०१ | ०० | -- |
| ५ | SR.INTENSIVIST | ०२ | ०१ | ०० | -- |
| ६ | JR.ANAETHISIOLOGIST | ०१ | ०१ | डॉ. दिपक सिंग सरदार, नाशिक | एमबीबीएस-१९८८ डी ए-२०११ |
| ७ | JR.RADIOLOGIST | ०२ | ०४ | १) डॉ. दिनेशकुमार मोहनसिंग परदेशी, नाशिक | एमबीबीएस-२००४ एमडी (रेडिओलॉजी)-२०११ |
| ८ | | | | २) डॉ. संदीप सिताराम कडू, नगर | एमबीबीएस-२००० एम.डी. (Forensic Med)-२००४ डी एम आर ई (CPS)-२०१० |
| ९ | C M O | ०३ | ०० | ०० | -- |
| १० | R M O | ०९ | १३ | १) डॉ विकास भिमराव देवकर, पांगरा, ता. औंढा नागनाथ | एमबीबीएस-२००९ |
| | | | | २) डॉ प्रताप वासुदेव राख, महासांगवी, ता पाटोदा | एमबीबीएस-२०११ |
| | | | | ३) डॉ सुधा अनिल कांबळे, श्रीरामपुर | एमबीबीएस-१९८३ |
| | | | | ४) डॉ विजयकुमार गंगाधरराव कोमुलवार, नांदेड | एमबीबीएस-२०१० |
| | | | | ५) डॉ. वैभव गणपत मालकर, वैजापुर | एमबीबीएस-२००७ टी डी डी (CPS)-२०११ |
| | | | | ६) डॉ. नितीन तुकाराम जगताप, केडगाव, अहमदनगर | एमबीबीएस-२०११ |
| ११ | R M O Pediatric Dept. | ०१ | ०० | ०० | -- |

**(क) UROSURGEON -** या पदाचे मुलाखतीसाठी एकही अर्ज प्राप्त झालेला नाही.

**(ख) PEDIATRICIAN -** या पदाचे मुलाखतीसाठी एकही अर्ज प्राप्त झालेला नाही.

**(ग) M O (Orthopaedic Surgeon) -** या पदाचे मुलाखतीसाठी ०६ उमेदवारांना बोलविण्यात आले होते. त्यापैकी दोन उमेदवार मुलाखतीस हजर होते. या दोन्ही उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. डॉ गोपाल महादेव शिंदे यांनी श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये नेमणूक करावी असे सांगितले परंतु सदर पदाची श्री साईनाथ रुग्णालयाकडे आवश्यकता असल्याने नेमणूकीसाठी निवड करणेत आली नाही. डॉ. राजेश उत्तम राजुळे यांची श्री साईनाथ रुग्णालयाकडे रु. ३५०००/- एकत्रित वेतनावर नेमणूक करण्यात यावी, असे ठरले.

**(घ) OPHTHALMOLOGIST -** या पदाचे मुलाखतीसाठी एक अर्ज प्राप्त झालेला होता. सदर उमेदवाराला मुलाखतीसाठी बोलविणेत आले होते परंतु ते मुलाखतीस उपस्थित नव्हते.

**(च) SR.INTENSIVIST -** या पदाचे मुलाखतीसाठी डॉ. किरण पी शेकडे यांचा अर्ज आलेला होता. परंतु त्यांनी मुलाखतीस येवु शकत नसल्याचे ई मेलद्वारे कळविले असून १५/०५/२०१२ नंतर येणार असल्याचे सांगितले. ते आलेनंतर त्यांची मुलाखत वैद्यकीय संचालक यांनी घ्यावी व नेमणूकी संदर्भात कार्यवाही करावी, असे ठरले.

**(छ) JR.ANAETHISIOLOGIST -** या पदासाठी डॉ दिपक सिंग सरदार हे एकमेव उमेदवार मुलाखतीसाठी हजर होते. त्यांची मुलाखत घेणेत आली असुन त्यांना सदर पदाचे कामकाजाचा अनुभव नसल्याने त्यांना कनिष्ठ भुलतज्ञ या पदावर नेमणूक देण्यात येवु नये असे ठरले.

**(ज) JR.RADIOLOGIST -** या पदाचे मुलाखतीसाठी तिन उमेदवारांना बोलविण्यात आले होते. त्यापैकी डॉ. दिनेश कुमार मोहनसिंग परदेशी व डॉ संदिप सिताराम कडू हे दोन उमेदवार मुलाखतीस हजर होते. त्यापैकी डॉ दिनेशकुमार मोहनसिंग परदेशी यांना श्री साईबाबा हॉस्पिटलकडे प्रत्येकी मासिक रु. ३२०००/- एकत्रित वेतनावर नेमणूक देवुन सी टी, एम आर आय व सोनोग्राफीसाठी मंजुर इंन्सेटीव्ह देण्यात यावा, असे ठरले.

**(झ)** **C M O** - या पदाचे मुलाखतीसाठी एकही अर्ज प्राप्त झालेला नाही.

**(ट)** **R M O** - या पदाचे मुलाखतीसाठी तेरा उमेदवारांना बोलविण्यात आले होते. त्यापैकी डॉ विकास भिमराव देवकर, डॉ विजयकुमार गंगाधरराव कोमुलवार, डॉ नितीन तुकाराम जगताप यांची श्री साईबाबा हॉस्पिटलकडे व डॉ. प्रताप वासुदेव राख, डॉ वैभव गणपत मालकर यांना श्री साईनाथ रुग्णालयाकडे प्रत्येकी मासिक रु. २७,०००/- एकत्रित वेतनावर नेमणूका देण्यात याव्यात, असे ठरले. तसेच डॉ सुधा अनिल कांबळे ह्या तिन महिन्यानंतर हजर होणार असल्याने त्यांचे नाव प्रतिक्षा यादीवर घेण्यात यावे, असे ठरले.

**(ठ) R M O Pediatric Dept.**- या पदाचे मुलाखतीसाठी एकही अर्ज प्राप्त झालेला नाही.

उपरोक्तप्रमाणे निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना संबंधीत पदांवर नेमणूका देऊन त्यास त्रिसदस्यीय समितीची मान्यता घेण्यात यावी व ज्या पदांवर उमेदवार उपलब्ध झाले नाहीत, अशा पदांची फेर जाहिरात देण्यात यावी, असे ठरले.

**निर्णय क्र.३७०** **त्यावर सविस्तर चर्चा होऊन दि. १८/०४/२०१२ रोजीचे मुलाखतीमधून निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना नेमणूक आदेश देण्यात यावा व ज्या पदांचे उमेदवार उपलब्ध झाले नाही, अशी पदे व ज्या पदांची आवश्यकता आहे, अशी पदे भरणेकामी वर्तमान पत्रामध्ये वर्षातून एकदाच Standing Advertise (स्थायी जाहिरात) प्रसिध्द करण्यात यावी व यामध्ये भरावयाच्या पदांबाबतची विस्तृत माहिती संस्थान वेबसाईटवर उपलब्ध असल्याचे नमूद करावे. त्यानंतर वॉक इंटरव्ह्यूव्ह घेण्याचे नियोजन करुन उमेदवारांच्या मुलाखती वैद्यकिय संचालक, वैद्यकिय अधिक्षक व कार्यकारी अधिकारी यांचे समितीसमोर घेऊन मुलाखतीचे इतिवृत्त मान्यतेसाठी मा. त्रिसदस्यीय / मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावे.**

**ज्या पदांचे उमेदवार उपलब्ध होणार नाहीत अशा पदांची व आवश्यक पदांची जाहिरात स्थायी जाहिरातीस अनुसरुन वेबसाईटवर वेळोवेळी अपडेट करण्यात यावी व येणाऱ्या अर्जदार उमेदवारांच्या मुलाखती प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या गुरुवारी वैद्यकिय संचालक, वैद्यकिय अधिक्षक व कार्यकारी अधिकारी यांचे समितीसमोर घेऊन मुलाखतीचे इतिवृत्त मान्यतेसाठी मा. त्रिसदस्यीय/मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावे,असें ठरलें.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१२.** **श्री रमेश शांताराम साबळे,प्रशासकीय अधिकारी यांचा सेवानिवृत्तीनंतर कंत्राटी पद्धतीने नेमणूक मिळणेबाबत दि.३०.०३.२०१२ चा अर्ज.**

**प्रस्ताव-** श्री रमेश शांताराम साबळे, प्रशासकिय अधिकारी यांनी दि.३०/०३/२०१२ रोजी अर्ज करुन त्यात -"मी सन १९८५ पासून संस्थानचे विविध विभागामध्ये सेवा केलेली असून प्रशासकिय अधिकारी म्हणून मार्च २००३ पासून सेवा करण्याची संधी मिळाली. या कालावधी मध्ये देण्यात आलेल्या जबाबदा-या यशस्वीपणे साभाळलेल्या आहेत.

संस्थान नियमाप्रमाणे विहीत वयोमानानुसार ३० एप्रिल २०१२ रोजी सेवानिवृत्त होत आहे. माझी शरीर प्रकृती चांगली असून येथून पुढेही काम करण्याची इच्छा आहे व गरजही आहे सेवानिवृत्ती नंतर मला मुदतवाढ देऊन पुन्हा सेवेची संधी द्यावी." अशी विनंती केली आहे.

सेवानिवृत्तीचे विहीत वयोमान ६०वर्षे पुर्ण झाल्यानंतर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडीचे सेवेंतून सेवानिवृत्त झालेले कर्मचारी यांना, त्याचे विनंती अर्जानुसार व संस्थानच्या आवश्यकतेनुसार या आधी खालील प्रमाणे कंत्राटी पध्दतीने एकत्रित मासिक मानधनावर नेमणुका दिलेल्या आहेत.

| अ. नं. | सेवानिवृत्त कर्मचा-यांचे नांव व पदनाम | सेवानिवृत्तीचे वेळेचा विभाग | सेवानिवृतीची तारीख | कंत्राटी पध्दतीने नेमणूकीचा कालावधी व पदनाम | प्रतिमहा मानधन रु. |
|---|---|---|---|---|---|
| **०१.** | श्री. सुभाष किसन जगताप<br>प्रशासकिय अधिकारी | प्रशासन शाखा | ३०/०६/२००७ | ०१ वर्ष<br>प्रशासकिय अधिकारी | २०,०००/- |
| **०२.** | श्री. प्रल्हाद गंगाधर शेळके<br>पाणीपुरवठा विभाग प्रमुख | पाणी पुरवठा विभाग प्रमुख | ३१/०३/२००९ | ०२/०१/२००९ पासून ०३/०४/२०१० अखेर पाणीपुरवठा प्रमुख | १५,०००/- |
| **०३.** | श्री.प्रकाश तुकारामपंत जोशी<br>प्रशासकिय अधिकारी | प्रशासन शाखा | ३०/०४/२००९ | ०६ महिने<br>विशेष कार्य अधिकारी | २१,०००/- |
| **०४.** | श्री.जयपाल राज ,वाहनचालक | मुंबई कार्यालय | ३१/१२/२००८ | ०३/०१/२०१० पासून ०२/०१/२०१३ | ७,०००/- |
| **०५.** | श्री.प्रकाश रामचंद्र खोत<br>अधीक्षक,कँटीन विभाग. | कँटीन विभाग. | २२/०९/२००९ | दि.०९/०८/२००९ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत विनंती अर्ज अमान्य करण्यात आला. | |
| **० ६.** | श्री.लक्ष्मण सदाशिव चव्हाण.<br>अधीक्षक,साभनि विभाग. | साभनि विभाग. | ३१/०५/२०१०. | अर्ज अमान्य करण्यात आला. | |
| **०७.** | श्री.प्रकाश रामचंद्र रत्नपारखी<br>अधीक्षक, द्वारावती निवासस्थान. | द्वारावती निवासस्थान. | ३०/०६/२०१० | अर्ज अमान्य करण्यात आला. | |
| **०८.** | श्री. एकनाथ ना. वाघ | प्रशासन शाखा | ३०/०४/२०११ | ०१ वर्ष रु.२१०००/- | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | प्रशासकिय अधिकारी | | | विशेष कार्यअधिकारी |
| **०९.** | श्री. प्रभाकर भि. बोरावके<br>प्रशासकिय अधिकारी | प्रशासन शाखा | ३१/०५/२०११ | ०१ वर्ष रु. २१०००/-<br>विशेष कार्यअधिकारी |
| **१०.** | श्री. शशीकांत अ. कुलकर्णी<br>ध्वनीक्षेपन विभाग प्रमुख | ध्वनीक्षेपन<br>विाााग | ३१/०७/२०११ | सहा महिने रु. १०,०००/-<br>कंत्राटी पध्दतीने विभाग प्रमुख |
| **११** | श्री. देवराम जयराम थोरात<br>लिपीक-टंकलेखक | खरेदी विभाग | ३१/०५/२०११ | सहा महिने<br>लिपीक-टंकलेखक रु. ८,०००/- |
| **१२** | श्री. अशोक वि. लोखंडे<br>सुतार | बांधकाम | ३०/०६/२०११ | सहा महिने रु. ७,०००/- |

तथापी उपरोक्त अ.नं. १०,११,१२ वरील कर्मचारी यांचे मुदतवाढी बाबतचे अर्ज मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर केले त्यावेळी खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

" श्री. शशीकांत अ.कुलकर्णी, श्री. अशोक विश्वनाथ लोखंडे, तसेच श्री. देवराम जयराम थोरात यांना सहा महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने एकत्रित मानधनावर नेमणूक करण्यात यावी. तसेच येथूनपुढे सेवानिवृत्त कर्मचा-यांनी सेवानिवृत्तीनंतर सेवेत मुदतवाढ मागितल्यास नाकारणेत येऊन सदर प्रस्ताव व्यवस्थापन समितीपुढे सादर करणेत येऊ नये."

उपरोक्त प्रमाणे परिस्थिती व आवश्यकतेनुसार उपरोक्त कर्मचा-यांना सेवानिवृत्तीनंतर कंत्राटी पध्दतीने ठरविक कालावधी साठी देण्यात आलेल्या नेमणूका व तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील उपरोक्त निर्णय विचारात घेऊन श्री.साबळे यांचे मुदतवाढीबाबतचे अर्जावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३७१** **आजचे सभेत मा.कार्यकारी अधिकारी यांनी असे सांगितले की, सध्या श्री साबळे हे संस्थानचे माहितीचा अधिकार अंतर्गत येणारी माहिती देण्याचे काम करत आहेत. याकरीता श्री साबळे यांना मुदतवाढ देणे आवश्यक आहे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री रमेश शांताराम साबळे,प्रशासकीय अधिकारी यांना सहा महिन्याचे कालावधीसाठी रुपये २१,०००/- एकत्रित मासिक मानधनावर ऑफीसर ऑन स्पेशल ड्यूटी या पदावर मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१३.** **डॉ.के.एन.टिंगरे, न्यूरो सर्जन, यांचा सेवानिवृत्तीनंतर श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये व्हिजीटींग न्यूरो सर्जन म्हणून नेमणूक देणेबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ. काशिनाथ नरसोबा टिंगरे, न्यूरो सर्जन श्री साईबाबा हॉस्पीटल, शिरडी यांचे वयास दि. ३१/०५/२०१२ रोजी ६० वर्षे पूर्ण होत असल्याने, प्रचलीत सेवानियमांनुसार जा.नं. एसएसएस/ एसएबीएच/ एचआर/ ९६२/ २०१२ दि. ०१/०३/२०१२. अन्वये त्यांना दि. ३१/०५/२०१२ चे माध्यान्होत्तर संस्थान सेवेतून निवृत्त होत आहे.

सेवा नि्त्तीनंतर न्यूरो सर्जनची सेवा पुढे चालू ठेवणेबाबत डॉ. टिंगरे यांनी दि. ०८/०३/२०१२ रोजी विनंती अर्ज सादर केला असून त्यात च सर्व प्रथम मी डॉ. काशिनाथ नरसोबा टिंगरे न्यूरो सर्जन म्हणून मला साईचरणी सेवा करण्याची संधी दिल्याबद्दल सर्व सन्माननीय विश्वस्तांचे व अधिकाऱ्यांचे प्रति कृतज्ञता व्यक्त करतो व तसेच सेवा निवृत्तीनंतर शिरडीच्या पावनभूमीत राहून मानद पूर्णवेळ न्यूरो सर्जनची कुशल व अनुभवी सेवा साई चरणी सेवानिवृत्तीनंतरही करण्याची इच्छा प्रगट करीत आहे. तरी मला यापूढेही सेवा करण्याची संधी उपलब्ध करुन द्यावी ही विनंती, असे नमूद केले आहे.

**डॉ. टिंगरे यांची माहिती खालीलप्रमाणे-**

| | | |
|---|---|---|
| **संपूर्ण नाव व पत्ता** | : | डॉ. काशिनाथ नरसोबा टिंगरे<br>५, निरंतर कॉलनी, सोहम अपार्टमेंट जवळ, पुंडलिक नगर रोड, गारखेडा, औरंगाबाद. |
| **शैक्षणीक पात्रता** | : | एम एस (ई एन टी), एम सी एच (न्यूरो सर्जरी), एल एल बी. |
| **जन्मतारीख** | : | दि. ०१/०६/१९५२ |
| **संस्थान सेवेत दाखल तारीख** | : | ०३/०५/२००६. सेवानिवृत्ती तारीख-३१/०५/२०१२ |
| **कामाचा एकूण कालावधी** | : | ०६ वर्षे. |
| **सध्याचे एकूण वेतन** | : | ४७,७८२/- (माहे मार्च २०१२) |

श्री साईबाबा हॉस्पीटलचे आकृतीबंधामध्ये न्यूरो सर्जनची दोन पदे मंजूर असून, सध्या या पदांवर डॉ. टिंगरे व डॉ. राहुल मोदगी हे काम करत आहे. आता डॉ. टिंगरे हे दि. ३१/०५/२०१२ चे माध्यान्होत्तर संस्थान सेवेतून निवृत्त होत आहे. त्यांना माहे मार्च, २०११ ते माहे एप्रिल,२०१२ या कालावधीमध्ये एकूण रु.३५,९३,१५२/- इन्सेंटीव्ह देण्यात आलेला आहे. म्हणजेच त्यांना सरासरी मासिक रु. २,९९,४२९/- इतका इन्सेंटीव्ह देण्यात आलेला आहे.

श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये डॉ. टिंगरे यांचे जागेवर न्यूरो सर्जनची आवश्यकता असल्याने, सदरचे पद भरणेकामी जाहिरात देऊन उमेदवाराची निवड होण्याची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत डॉ. के. एन. टिंगरे यांना श्री साईबाबा हॉस्पीटलकडे ०६ महिने कालावधीसाठी व्हिजीटींग न्यूरो सर्जन म्हणून नेमणूक देऊन त्यांना ओ

पी डी व ऑपरेशन चार्जेस वर सध्याच्या प्रचलीत पध्दतीने मिळणारा इंन्सेंटीव्ह देता येईल, अशी वैद्यकिय संचालक यांनी शिफारस केली आहे.

तरी, वैद्यकिय संचालक यांचे शिफारसीनुसार डॉ. के. एन. टिंगरे यांना सेवा निवृत्तीनंतर श्री साईबाबा हॉस्पीटलकडे ०६ महिने कालावधीसाठी व्हिजीटींग न्यूरो सर्जन म्हणून नेमणूक देऊन त्यांना ओ पी डी व ऑपरेशन चार्जेस वर सध्याच्या प्रचलीत पध्दतीने मिळणारा इंन्सेंटीव्ह देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३७२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ. के. एन. टिंगरे यांना सेवा निवृत्तीनंतर श्री साईबाबा हॉस्पीटलकडे ०६ महिने कालावधीसाठी रुपये २४,०००/- मासिक मानधनावर न्यूरो सर्जन म्हणून नेमणूक देऊन त्यांना ओ पी डी व ऑपरेशन चार्जेस वर सध्याच्या प्रचलीत पध्दतीने मिळणारा इंन्सेंटीव्ह देण्यात यावा. दरम्यानचे काळात न्युरो सर्जन पदावर नेमणूक करणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन अर्ज मागविण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१४.** **श्री शशिकांत अंबादास कुलकर्णी, कंत्राटी ध्वनीक्षेपन विभागप्रमुख यांचा मुदतवाढ मिळणेबाबतचा अर्ज.**

**प्रस्ताव-** श्री शशिकांत अंबादास कुलकर्णी, कंत्राटी पध्दतीने ध्वनीक्षेपण विभाग प्रमुख यांनी दि.१०/०३/२०१२ चे अर्जाने खालीलप्रमाणे विनंती केलेली आहे.

" मी सन १९७१ ते २०११ पर्यंत संस्थान सेवेत नोकरी केल्यानंतर मी ३१/०७/२०११ रोजी सेवानिवृत्त झालो आहे. तदनंतर मला जा.नं.एसएसएस वशी ०१/२४४६/२०११ दि.२६/०९/२०११ अन्वये सहा महिन्यासाठी मुदतवाढ मिळालेली आहे. सदरची मुदत २८/०३/२०१२ अखेर संपुष्ठात येत आहे. मी सदर सहा महिन्याच्या कालावधीत भक्तोपयोगी चांगली कामे केलेली आहे मार्च २०१२ नंतर साईआश्रम भाग १ व २ ची फायबर ऑप्टीक व ऑडीओच्या केबल अंडरग्राऊंड टाकणे तसेच ट्रान्समीशन रिसिव्हर ऑडीओ-व्हीडीओची कामे करावयाची आहे ती मला चांगल्याप्रकारे अवगत आहेत ती कामे मी व्यवस्थीतपणे पार पाडू शकतो माझी शारिरीक क्षमता चांगल्याप्रकारे असून मला मार्च नंतर सहा महिन्याची मुदतवाढ मिळावी "

सदर अर्जावर मा.विश्वस्त डॉ.गोंदकर साो, श्री सुरेश वाबळे साो, श्री खांबेकर साो तसेच सौ सुमित्रा कोतेमॅडम यांनी " मुदतवाढीचा अर्ज हा व्य.मंडळासमोर ठेवावा. " असा अभिप्राय दिलेला आहे.

श्री कुलकर्णी यांचे विहित वयोमान पूर्ण झालेनंतर त्यांना दि.३१/०७/२०११ रोजी सेवानिवृत्त करण्यात आले होते. तद्नंतर मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार त्यांना सहा महिन्यांसाठी ध्वनीक्षेपण विभागाकडे कंत्राटी पध्दतीने नेमणूक करण्यात आली असून त्यांना देण्यात आलेल्या नेमणूकीचा सहा महिन्याचा कालावधी दि.२७/०३/२०१२ अखेर संपुष्ठात येत आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०८/२०११ चे निर्णय क्र.६६१ " येथून पुढे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी सेवानिवृत्तीनंतर सेवेत मुदतवाढ मागितल्यास नाकारणेत येऊन सदर प्रस्ताव व्यवस्थापन समितीपुढे सादर करणेत येऊ नये " असा झालेला आहे.

उपरोक्त परिस्थिती विचारात घेता श्री कुलकर्णी यांचे मुदतवाढीच्या अर्जावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३७३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री शशिकांत आंबादास कुलकर्णी, कंत्राटी ध्वनीक्षेपन विभागप्रमुख यांना सेवानिवृत्तीनंतर एक वेळ सहा महिने कालावधीसाठी मुदतवाढ दिलेली असल्याने श्री कुलकर्णी यांची मुदतवाढ मिळणेबाबतची विनंती अमान्य करण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**विषय नं.१५.** **श्री.देवराम जयराम थोरात, कंत्राटी लिपीक-टंकलेखक यांचे मुदतवाढ मिळणेचे अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री देवराम जयराम थोरात, कंत्राटी पध्दतीने लिपीक टंकलेखक, भक्तनिवासस्थान विभाग यांनी दि.०५/०४/२०१२ चे अर्जाने खालीलप्रमाणे विनंती केलेली आहे.

" I am capable to take any responsibility of the official routine work. I am healthy & without any illness so capable to think with strong will powerly positive thinking . I am very needy person for employment so that I can reduce my economical problem to maintain family members also. I am at present in the debt of bank loan my extension period definitely helpful for repayment of the loan. You are therefore requested to give me a chance by giving extension in the service I have completed first extension period of six month very satisfactory & successfully. "

श्री थोरात यांचे विहित वयोमान पूर्ण झालेनंतर त्यांना दि.३१/०५/२०११ रोजी सेवानिवृत्त करण्यात आले होते. तद्नंतर त्यांची विनंती व मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार त्यांना सहा महिन्यांसाठी साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडे कंत्राटी पध्दतीने प्रतिमहा रु.८०००/- एकत्रित मानधनावर नेमणूक करण्यात आली असून सदर सहा महिन्याचा कालावधी दि.२९/०३/२०१२ अखेर संपुष्ठात आला आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०८/२०११ चे निर्णय क्र.६६१ " येथून पुढे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी सेवानिवृत्तीनंतर सेवेत मुदतवाढ मागितल्यास नाकारणेत येऊन सदर प्रस्ताव व्यवस्थापन समितीपुढे सादर करणेत येऊ नये " असा झालेला आहे.

उपरोक्त परिस्थिती विचारात घेता श्री थोरात यांचा मुदतवाढ मिळणेबाबतचा अर्जावर निर्णय होणेस विनंती तसेच यापूढे मा.व्यवस्थापन समितीचे सभेपूढे कोणत्या हुद्देवारीचे अथवा सर्व मागणी करणारे अर्जदारांचे अर्ज मुदतवाढीसाठी सादर करावयाचे याबाबत धोरण निश्चित होणेस विनंती.

**निर्णय क्र.३७४ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.देवराम जयराम थोरात, कंत्राटी लिपीक-टंकलेखक यांना सेवानिवृत्तीनंतर एक वेळ सहा महिने कालावधीसाठी मुदतवाढ दिलेली असल्याने श्री थोरात यांची मुदतवाढ मिळणेबाबतची विनंती अमान्य करण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**विषय नं.१६. श्रीमती हिराबाई भानूदास चव्हाण, स्त्री मदतनीस मंदिर विभाग यांचा सेवानिवृत्तीनंतर कंत्राटी पद्धतीने नेमणूक मिळणेबाबतचा अर्ज.**

**प्रस्ताव-** श्रीमती हिराबाई भानूदास चव्हाण, स्त्री मदतीनस, मंदिर विभाग यांनी दि.०४/०३/२०१२ चे अर्जाने खालीलप्रमाणे विनंती केलेली आहे.

" मी मंदिर विभागात कायम कर्मचारी म्हणून कामावर आहे. माझी बदली मंदिर विभागात झालेपासून मी अत्यंत प्रामाणिकपणे व काळजीपूर्वक काम केलेले आहे. मंदिर विभागात माझेवर सोपवून दिलेल्या कामाची जबाबदारी अत्यंत प्रामाणिकपणे पार पाडलेली आहे. मी दि.३१/०३/२०१२ अखेर सेवानिवृत्त होत आहे. माझी सेवानिवृत्तीनंतरही श्री साईबाबांची सेवा करण्याची इच्छा आहे. संस्थानमधील काही सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना ज्याप्रमाणे संस्थान सेवेत कंत्राटी पध्दतीने घेतले आहे त्याप्रमाणे मलाही कंत्राटी पध्दतीने संस्थान सेवेत समावून घ्यावे. "

सदर अर्जावर मा.अध्यक्ष सो यांनी " १ वर्षाचा मुदतवाढीचा येत्या सभेपुढे ठेवणे " असा अभिप्राय दिलेला आहे.

श्रीमती चव्हाण हया दि.३१/०३/२०१२ अखेर त्यांचे विहित वयोमान पूर्ण होत असल्याने त्यांना जा.नं.एसएसएस वशी ०१/४७४८/२०१२ दि.२०/०१/२०१२ अन्वये सेवानिवृत्तीचा आदेश पारीत करण्यात आलेला आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०८/२०११ चे निर्णय क्र.६६१ मध्ये " येथून पुढे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी सेवानिवृत्तीनंतर सेवेत मुदतवाढ मागितल्यास नाकारणेत येऊन सदर प्रस्ताव व्यवस्थापन समितीपुढे सादर करणेत येऊ नये असा झालेला आहे. "

श्रीमती चव्हाण, स्त्री-मदतनीस, मंदिर विभाग यांच्या मुदतवाढीबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३७५ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीमती हिराबाई भानूदास चव्हाण, स्त्री मदतनीस मंदिर विभाग यांना सहा महिने कालावधीसाठी कंत्राटी अकुशल कामगार म्हणून कंत्राटदारामार्फत कामास घेण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग/कामगार अधिकारी)

---

**विषय नं.१७. श्री.मच्छिंद्र काशिनाथ थोरात, फार्मसिस्ट यांचा मटेरिअल मॅनेजर या पदावर पदोन्नती मिळणेबाबतचा अर्ज.**

**प्रस्ताव-** श्री मच्छिंद्र काशिनाथ थोरात फार्मासिस्ट (मटेरियल मॅनेजर पदाचा अतिरिक्त कार्यभार) यांनी दिनांक १९/०२/२०१० रोजीचे अर्जाने विश्वस्त मा. डॉ. ए.भा. गोंदकर यांचेकडे विनंती अर्ज केला आहे की, प्रशासन शाखा जा.क्र. एसएसएस/वशी-०१/२१४४/२००७, दि.१०/०८/२००७ चे आदेशान्वये माझ्याकडे मटेरीयल मॅनेजर या पदाचा अतिरिक्त कार्यभार दिलेला आहे. सदर आदेशानुसार दोन्ही रुग्णालयाच्या सर्व प्रकारची खरेदीची कामे माझ्याकडे सोपविलेली आहे. मला सदर पदाची वेतनश्रेणी व पदनाम मिळावे म्हणून मी यापूर्वी दि.३०/०७/२००८ चे अर्जान्वये विनंती केली होती. त्यानंतर मी पुन्हा दि. २०/०१/२००९ व दि. २८/७/२०१० चे अर्जान्वये मा. कार्यकारी अधिकारी सो., यांचेकडे विनंती करुन जर आपणांस मटेरीयल मॅनेजर हे पद व वेतनश्रेणी देता येऊ शकत नसेल तर माझ्याकडील अतिरिक्त कार्यभार काढून घ्यावा अशी विनंती केली होती. परंतु अद्याप कार्यभार काढून घेण्यात आलेला नाही. तरी मी आपणास नम्र विनंती करतो की, आपण मी दिलेल्या दि.२०/०१/२००९ व दि. २८/०७/२०१० चे अर्जाचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन एक तर मला पदोन्नती देऊन वेतनश्रेणी व पदनाम देण्यात यावे किंवा माझ्याकडील मटेरियल मॅनेजर या पदाचा अतिरिक्त कार्यभार काढून घ्यावा अशी विनंती केलेली आहे.

श्री थोरात यांना पदोन्नती देणेबाबत विश्वस्त मा. डॉ. ए.भा. गोंदकर यांनी दि. ०७/१०/२०११ रोजीचे पत्रान्वये पुढीलप्रमाणे शिफारस केलेली आहे. श्री थोरात हे साईबाबा रुग्णालयाचे सुरुवातीपासूनच सर्व प्रकारचे औषधे, मशिनरी, फर्निचर इत्यादींचे टेंडर काढणे, तुलनात्मक तक्ते तयार करुन बोर्डासमोर सादर करुन त्या विषयांवर चर्चा / वाटाघाटी करणे व अंतिम निर्णय घेणे आदि कामे व्यवस्थीत करत असून त्यांचे कामात आतापर्यंत उणिव आढळून आलेली नाही. त्यांचे काम समाधानकारक असून त्यांना मटेरियल

मॅनेजर या पदावर पदोन्नती देण्यास हरकत नाही. सदर विषय मा. व्यवस्थापन मंडळाच्या सभेपुढे ठेवण्यात यावा ही विनंती.

**श्री मच्छिंद्र काशिनाथ थोरात यांची माहिती खालीलप्रमाणे:-**

| | | |
|---|---|---|
| **संपुर्ण नांव** | **:-** | **श्री मच्छिंद्र काशिनाथ थोरात** |
| **शैक्षणिक पात्रता** | **:-** | **एस.एस.सी./डी फॉर्म** |
| **जन्म तारीख** | **:-** | **दि.२०/०७/१९६६** |
| **संस्थान सेवेत दाखल तारीख व पदनाम** | **:-** | **०१/११/१९९० फार्मासिस्ट** |
| **अतिरिक्त कार्यभाराचे पद व तारीख** | **:-** | **मटेरियल मॅनेजर, दि. १३/०८/२००७ पासून** |

श्री थोरात यांना १२ वर्षानंतर सेवांतर्गत, अश्वासीत प्रगती योजनेअंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी रुपये ५०००-१५०-८००० मंजूर करण्यात आलेली आहे. त्याचे सुधारित वेतन बँड रु. ९३००-३४८०० मध्ये सध्याचे मुळ वेतन रुपये १४४९० + ग्रेड पे रुपये ३५०० असे आहे.

रुग्णालयासाठी शासनाने मंजूर केलेल्या आकृतीबंधामध्ये मटेरियल्स स्टोअर मॅनेजर (भांडार व माल व्यवस्थापक) हे एक पद मंजूर आहे. स्वतंत्र स्टोअर मॅनेजर व मटेरियल मॅनेजर ही दोन वेगळी पदे नाहीत. स्टोअर मॅनेजर या पदावर श्री दिलीप शर्मा (औदिच्य) यांची नेमणूक केलेली आहे. सदर पदाची सुधारित वेतनश्रेणी रु.९३००-३४८०० व ग्रेड पे ४४०० अशी आहे.

यापूर्वी श्री थोरात यांनी दि. ३०/०७/२००८ रोजी मटेरियल मॅनेजर या पदाचे पदनाम व वेतनश्रेणी मिळणेबाबत अर्ज सादर केला होता. श्री थोरात यांना मटेरियल मॅनेजर हे पदनाम व सदर पदाची वेतनश्रेणी देणेबाबत विचार करावयाचा झाल्यास स्वतंत्र मटेरियल मॅनेजर पद निर्माण करावे लागेल व त्यास शासनाची मान्यता घ्यावी लागेल असा प्रस्ताव दि.१८/१०/२००८ रोजी मा. व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये विचारार्थ सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर चर्चा होऊन निर्णय क्र. ७५९ (२४) अन्वये सदर विषयावरील चर्चा तहकूब ठेवण्यात यावी, असा निर्णय झालेला आहे.

मा. कार्यकारी अधिकारी यांचे निर्देशानुसार श्री मच्छिंद्र काशिनाथ थोरात यांचे पदोन्नतीचे अर्जाबाबत दि. २५/१२/२०११ रोजीचे वैद्यकिय अधिकारी यांचे मुलाखतीचे वेळी विशेष कार्य अधिकारी श्री. ई.एन. वाघ व एच.आर. मॅनेजर श्री. आर.बी. नवले यांनी विश्वस्त डॉ. ई.बी. गोंदकर यांचेशी श्री मच्छिंद्र काशिनाथ थोरात यांचे मटेरियल मॅनेजर या पदावर पदोन्नती मिळणेच्या अर्जाबाबत समक्ष चर्चा केलेली आहे.

सदर चर्चेत मा. विश्वस्त डॉ. गोंदकर यांनी सांगीतले की, च्श्री थोरात फार्मासिस्ट हे श्री साईनाथ रुग्णालयाकडे सेवेत असतांना प्रथम पासून त्यांनी खरेदी संबंधीत कामे केलेली आहेत. त्यापूढे श्री साईबाबा हॉस्पीटल सुरु झाल्यानंतर आजपर्यंत दोनही हॉस्पीटलचे संबंधीत खरेदी विषयक कामे श्री थोरात पहात आहेत. त्यांचे काम समाधानकारक असून त्यांचे कामांत आतापर्यंत कधीही कमतरता आढळून आलेली नाही. हॉस्पीटल खरेदी विषयक कामाचा त्यांचा प्रदीर्घ अनुभव व त्यांचे समाधानकारक काम विचारात घेऊन एक खास बाब म्हणून त्यांना मटेरियल मॅनेजर पदावर पदोन्नती देण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीसमोर सादर करणेत यावा छ.

विश्वस्त डॉ. गोंदकर यांनी असेही सांगितले की, श्री थोरात यांना मटेरियल मॅनेजर हे पद देण्यास अडचण असल्यास त्यांना खरेदी व्यवस्थापक हे पद देण्यांत यावे. खरेदी व्यवस्थापक या पदासाठी असलेली B.Pharm/M.Pharm+MBA, MSCIT ही शैक्षणिक पात्रता श्री थोरात यांचेकडे नाही तरीसुध्दा आजवरचा संस्थानचे दोन्ही हॉस्पीटलचे खरेदी विषयक त्यांचे कामाचा प्रदीर्घ अनुभव व त्यांचे कामाची गुणवत्ता विचारात घेऊन एक खास बाब म्हणून पदोन्नतीसाठी त्यांचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीसमोर ठेवावा.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे मा. विश्वस्त डॉ. ई.बी. गोंदकर यांनी उपरोक्तप्रमाणे केलेल्या सूचनांनुसार श्री मच्छिंद्र काशिनाथ थोरात यांचे पदोन्नतीबाबतचे प्रस्तावावर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३७६ यावर सविस्तर चर्चा होऊन, रुग्णालयासाठी शासनाने मंजूर केलेल्या आकृतीबंधामध्ये मटेरियल्स स्टोअर मॅनेजर (भांडार व माल व्यवस्थापक) हे एक पद मंजूर आहे. स्वतंत्र स्टोअर मॅनेजर व मटेरियल मॅनेजर ही दोन वेगळी पदे नाहीत. स्वतंत्र स्टोअर मॅनेजर व मटेरियल मॅनेजर ही पदे निर्माण करावयाची झाल्यास शासनाने मंजूर केलेल्या आकृतीबंधात बदल करावा लागेल. तसेच मटेरियल मॅनेजर या पदांसाठी आवश्यक असलेली शैक्षणिक पात्रता श्री मच्छिंद्र काशिनाथ थोरात, फार्मसिस्ट यांचेकडे नसल्याने मटेरिअल मॅनेजर या पदावर पदोन्नती मिळणेबाबतची त्यांची विनंती अमान्य करण्यात यावी,असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**विषय नं.१८. संगणक लेखी प्रात्यक्षिक परिक्षेत सूट मिळून अधिक्षक या पदावर पदोन्नतीने नेमणूक होणे बाबत श्री.श्रावण चौधरी, वरीष्ठ लिपीक व इतर यांचा अर्ज.**

**प्रस्ताव-** श्री. श्रावण माधव चौधरी वरिष्ठ-लिपीक बांधकाम विभाग यांनी दि.२०/०२/२०१२ रोजी मा.राधाकृष्ण विखेपाटील सो मंत्री कृषी व पणन विभाग महाराष्ट्र राज्य व विश्वस्त श्री साईबाबा संस्थान

विश्वस्तव्यवस्था,शिरडी यांचे नांव अर्ज अग्रेशीत केला त्यात " शैक्षणिक पात्रता पूर्ण करणा-या वरिष्ठ-लिपीक, लिपीक यांना पदोन्नती देणेकरीता त्यांची लेखी परीक्षा व प्रात्यक्षीक परीक्षा घेण्याबाबत संस्थानचे सर्व विभागांना कळविण्यात आलेले आहे.महाराष्ट्र राज्य शासन निर्णय क्रमांक सेप्रनि-२००२/प्र.क्र.१४/०२/१२ मंत्रालय मुंबई-४०० ०३२ दि.०२/०९/२००३ अन्वये दि.३१/१२/२००७ रोजी ज्या शासकिय कर्मचा-याचे वयास ५० वर्षे पूर्ण झाली आहेत अशा कर्मचा-यांना संगणक अहर्ततेच्या प्रमाणपत्र सादर करण्यापासून सूट देण्यात आली आहे. म्हणजेच अशा कर्मचा-यांना संगणक चालवता येत नसेल तरी त्यांना पदोन्नती देण्यात यावी असा शासनाचा निर्णय झालेला आहे.

माझी जन्मतारीख दि.०१/०६/१९५३ असून सद्या माझे वय ५८ वर्षे ०९ महिने असून दि.३१/१२/२००७ रोजी माझे वय ५४ वर्षापेक्षा जादा आहे. दि.३१/०५/२०१३ रोजी मी संस्थान सेवेतून निवृत्त होणार आहे. माझी संस्थान सेवा फक्त ०१ वर्ष ०३ महिने शिल्लक आहे.

मी बी.ए. इंग्लिश पास असून वरिष्ठ लिपीकांच्या सेवा जेष्ठता यादीमध्ये माझा वरुन फक्त ०६ वा नंबर असून माझ्या वरचे २-३ व्यक्ती पदवीधर नाहीत म्हणजेच मी वरच्या पदोन्नतीसाठी निश्चितच पात्र आहे. तरी मला प्रात्यक्षिक परीक्षेची सवलत मिळावी. माझी परीक्षा घेण्यात येऊ नये व मला लवकरातलवकर वरची पदोन्नती मिळावी व वरच्या पदावर काम करण्याची संधी मिळावी 'असे नमूद केले आहे. सदर अर्जावर 'संस्थान C.E.O.कार्यवाही करावी' असे अभिप्राय दिले आहेत.

तसेच श्री. गोविंद संभाजी खांडरे, वरिष्ठ-लिपीक व इतर ०८ वरिष्ठ -लिपीक यांनी दि.२२/०२/२०१२ रोजी उपरोक्त प्रमाणेच परीक्षेतून सूट मिळणेबाबत अर्ज केला आहे.

अधिक्षक,उपअधिक्षक ,वरिष्ठ-लिपीक/कनिष्ठ पर्यवेक्षक या पदासाठी खालीलप्रमाणे शैक्षणिक पात्रता प्रस्तावीत करण्यात आलेली आहे.

| Post Name & 6th Payband + Grade pay | By Nomination | By Promotion |
|---|---|---|
| **Superintendent**<br>PAYBAND<br>9300- 34800<br>Grade Pay -4400 | --- | 1) Graduate from any recognized University<br>2) MS-CIT or Govt. prescribed equivalant Computer Operating Course.<br>3) Experience of 05 yrs as Dy. Superintendent or 07 as Sr.Clerk |
| **Dy.Superintendent**<br>PAYBAND<br>9300- 34800<br>Grade Pay -4200 | --- | 1) Graduate from any recognized University<br>2) MS-CIT or Govt. prescribed equivalant Computer Operating Course.<br>3) Experience min 5 yrs as Jr.Clerk or Jr.Supervisor |
| **Sr. Clerk /Jr. Supervisor**<br>PAYBAND<br>5200-20200<br>Grade Pay -2400 | --- | 1) Graduate from any recognized University<br>2) MS-CIT or Govt. prescribed equivalant Computer Operating Course.<br>03) Govt.Commercial certificate of Typing 40 w.p.m. & Marathi 30 w.p.m.speed<br>4) Experience of 03 yrs as Jr.Clerk |

शासनाकडून सेवानियमास मिळणा-या मान्यतेच्या अधीन राहून आकृतीबंधानुसार स्थायी मंजूर विविध पदांवर पात्र कर्मचा-यांना पदोन्नती देणेसाठी तत्वतः मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करण्यात आला होता.

त्यावर चर्चा होऊन "शासनाकडून सेवाप्रवेश नियमास मिळणा-या मान्यतेच्या अधिन राहून मंजूर कर्मचारी आकृतीबंधानुसार विविध हुद्देवारीतील रिक्त पदांवर पात्र कर्मचा-यांना पदोन्नती देण्यास तत्वता मान्यता देण्यात आली. विविध रिक्त पदांवर कम्रचा-यांना पदोन्नती देतांना, पदोन्नती द्यावयाचे पद व त्या पदावर पदोन्नती देण्यासाठी पात्र असलेला संवर्ग, पदोन्नती पदाची शैक्षणिक पात्रता पदोन्नती द्यावयाच्या कर्मचा-यांचे गोपनीय अहवाल व पदोन्नतीच्या पदावर काम करण्याची कुवत इत्यादी बाबी विचारात घेण्यात याव्यात.

श्री साईबाबा संस्थान हे जागतीक किर्तीचे देवस्थान असून देशविदेशातून साईभक्त शिरडी येथे श्री साईचे दर्शनासाठी येतात. शिरडी येणा-या भक्तांना दैनंदिन आवश्यक त्या सर्व पायाभूत सेवा सुविधा योग्य पध्दतीने देणे हा संस्थान प्रशासनाचा उद्देश आहे. त्या दृष्टीने सध्या विविध योजना कार्यान्वीत करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून संस्थान मध्ये जागतीक दर्जाचा आय.टी.प्रोजेक्ट राबविण्यात येत असून संस्थानचे सर्व विभागांचे संगणकीकरण करण्यात येत आहे. या आधीची टाईपरायटरची जागा आता संगणकाने घेतली आहे. त्यामुळे कर्मचा-यांना संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक झाले असून प्राप्त परिस्थितीत ही काळाची गरज आहे. त्यामुळे पदोन्नती द्यावयाचे पदावर, पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या संवर्गातील कर्मचा-यांची संबंधीत पदावर काम करण्याची कुवत व गुणवत्ता तपासण्यासाठी प्रात्यक्षिक संगणकीय चाचणी व लेखी परीक्षा घेण्यात यावी व परीक्षामध्ये मिळणा-या गुणानुसार त्यांची शैक्षणिक पात्रता विचारात घेऊन पदोन्नती देण्यात यावी. या परीक्षेत पदोन्नतीस अपात्र ठरणा-या अथवा गुणवत्ता प्राप्त न होणा-या कर्मचा-यांना संधी देण्याचे दृष्टीने त्यांना सहा महिन्याची मुदत देऊन त्यांची पुन्हा समिती समोर फेर परीक्षा घेण्यात यावी.

या परीक्षेचे आयोजन करण्यासाठी सल्लागार म्हणून श्री. प्रशांत खंबसवाडकर, नाशिक यांची नियुक्ती करण्यात यावी. तसेच पदनिहाय रिक्त पदांवर पदोन्नती देण्यासाठी मा.ना.राधाकृष्ण एकनाथराव विखे पाटील, मा.श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.श्री.शैलेश कुटे, मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व मा.श्री. अशोक भिमाशंकर खांबेकर या पाच सदस्यांची समिती गठीत करण्यात येत असून या समितीसमोर परीक्षेची कार्यवाही करण्यात येऊन कर्मचा-यांना पदोन्नती देण्यात यावी.

कर्मचा-यांना वरिष्ठ पदांवर पदोन्नती द्यावयाची कार्यवाही ही विभागांतर्गत परीक्षा घेऊन करावयाची असल्याने जात-प्रवर्ग आरक्षणाबाबत विचार करण्यात येऊ नये." असा निर्णय झाला आहे.

संस्थान आस्थापनेवर सद्या वरिष्ठ-लिपीक या पदावर एकूण -४३ कर्मचारी कार्यरत आहेत. पैकी १४ कर्मचा-याकडे अधिक्षक पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक पात्रता नाही. तसेच २९ कर्मचा-याकडे अधिक्षक पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक पात्रता आहे. सदर २९ कर्मचा-यापैकी ०९ कर्मचा-यांनी संगणक परीक्षा व लेखी परीक्षा घेऊ नये व त्यामध्ये सूट मिळून अधिक्षक पदावर पदोन्नती मिळणेबाबत विनंती अर्ज केलेला आहे.

मा.व्यवस्थापन समितीचा उपरोक्त निर्णय झालेला असल्याने श्री. श्रावण माधव चौधरी वरिष्ठ-लिपीक व श्री. गोविंद संभाजी खांडरे व इतर ०८ वरिष्ठ-लिपीक यांनी मा.ना.राधाकृष्ण विखे पाटील यांना उपरोक्त अर्जाने केलेली विनंती व त्यावरील निर्देश विचारात घेऊन संबंधीतांना संगणक परीक्षा व लेखी प्रात्यक्षिक परीक्षा घेणेबाबत सूट देणेचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३७७** **श्री साईबाबा संस्थान हे जागतीक किर्तीचे देवस्थान असून देशविदेशातून साईभक्त शिरडी येथे श्री साईचे दर्शनासाठी येतात. शिरडी येणा-या भक्तांना दैनंदिन आवश्यक त्या सर्व पायाभूत सेवा सुविधा योग्य पध्दतीने देणे हा संस्थान प्रशासनाचा उद्देश आहे. त्या दृष्टीने सध्या विविध योजना कार्यान्वीत करण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून संस्थान मध्ये जागतीक दर्जाचा आय.टी.प्रोजेक्ट राबविण्यात येत असून संस्थानचे सर्व विभागांचे संगणकीकरण करण्यात येत आहे. या आधीची टाईपरायटरची जागा आता संगणकाने घेतली आहे. त्यामुळे कर्मचा-यांना संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक झाले असून प्राप्त परिस्थितीत ही काळाची गरज आहे. श्री.श्रावण माधव चौधरी, वरीष्ठ लिपीक व इतर वरिष्ठ लिपिक यांनी खाजगी प्रशिक्षण घेऊन, संस्थानमार्फत घेण्यात येणारी प्रात्यक्षिक संगणकीय चाचणी व लेखी परीक्षा द्यावी.**

**सबब संगणक लेखी प्रात्यक्षिक परिक्षेत सूट मिळून अधिक्षक या पदावर पदोन्नतीने नेमणूक होणे बाबत श्री.श्रावण चौधरी, वरीष्ठ लिपीक व इतर यांची विनंती अमान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**विषय नं.१९.** **श्री प्रल्हाद गोरक्षनाथ कर्डीले, आचारी प्रसादालय यांना संस्थान सेवेत कायम करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री प्रल्हाद गोरक्षनाथ कर्डीले, यांची मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे प्रत्यक्ष मुलाखत घेण्यात येऊन जा.नं.एसएसएस/वशी-०१/१८१४८/२००६ दि.२१/१२/२००६ अन्वये कंत्राटी पध्दतीने सहाय्यक आचारी या पदावर प्रथम एक वर्षाचे कालावधीसाठी दरमहा रु.४०००/- एकत्रित मानधनावर नेमणूक करण्यात आलेली असून ते दि.२८/१२/२००६ रोजी कामावर हजर झाले आहेत.

श्री. कर्डीले यांचा मानधनावरील सेवेचा एक वर्षाचा कालावधी दि.२७/१२/२००७ रोजी संपुष्ठात आल्यानंतर त्यांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील मान्यतेने वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

शासन निर्णय क्र.सासंवि-२००९/४३३(३७०९)का.सोळा दि.०७/०८/२००९ अन्वये श्री साईबाबा संस्थान कर्मचारी आकृतीबंधास मान्यता देण्यात आली. त्यानुसार आकृतीबंधातील आचारी या रिक्त पदावर मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.३४८ नुसार जा.नं.एसएसएस/वशी-०१/१२१६/२०१० दि.१२/०४/२०१० अन्वये श्री कर्डीले यांची वेतन बँड रु.४४४०-७४४० ग्रेडवेतन रु.१६०० /- देऊन दि.०७/०८/२००९ पासून पुढे एक वर्ष परिवीक्षाधीन कालावधीवर नेमणूक करण्यात आली. त्यांचा परिवीक्षाधीन कालावधी दि.०६/०८/२०१० अखेर संपुष्ठात आला आहे.

सदर एक वषाचे परीवीक्षाधीन कालावधी मध्ये श्री. कर्डीले यांचे काम व वर्तणूक कशी आहे ?ते हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात किंवा कसे? त्यांचे बाबतीत काही प्रकरणे चालू अथवा प्रस्तावीत आहेत काय? त्यांना संस्थान सेवेत कायम करावे अगर कसे ? याबाबत अधिक्षक प्रसादालय यांचेकडून अभिप्राय मागविण्यात आले होते.

"श्री. कर्डीले आचारी यांचे काम समाधानकारक असून ते हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात. त्यांचे बाबतीत कोणतीही प्रकरणे चालू अथवा प्रस्तावीत नाहीत. त्यांना सेवेत कायम करणेस हरकत नाही, " असे अभिप्राय अधिक्षक प्रसादालय विभाग यांनी दिले आहेत.

महाराष्ट्र नागरी सेवा वेतन नियम -१९८१ नुसार परिवीक्षाधीन म्हणून एखाद्या पदावर थेट नियुक्त केलेल्या शासकिय कर्मचा-याचे परिवीक्षेच्या कालावधीत वेतनवाढीबाबत खालील प्रमाणे तरतूद आहे.

(एक) अशा कर्मचा-याची पहिली वेतनवाढ, त्याचा एक वर्षाचा परिवीक्षेचा कालावधी पूर्ण झाल्यावर देण्यात यावी. आणि नंतरची वेतनवाढ त्याने परिवीक्षेचा कालावधी समाधानकारकरीत्या पूर्ण केल्यावर देण्यात यावी.

(दोन) एखाद्या कर्मचा-याचा परिवीक्षेचा कालावधी विहीत अवधीत तो विभागीय परीक्षा उत्तीर्ण न झ ाल्यामुळे किंवा परिवीक्षेच्या कालावधी मध्ये त्याने रजा घेतल्यामुळे लांबलेला असेल आणि अशा कर्मचा-याने परिवीक्षेचा कालावधी समाधानकारकरीत्या पूर्ण केल्यानंतर दीर्घ मुदतीच्या तत्वावर त्याची त्या पदावर नियुक्ती झाली असेल तेंव्हा, जर तो परिवीक्षाधीन नसता तर, त्याला जे वेतन मिळाले असते असे वेतन व अनुषंगिक थकबाकी देण्यात यावी.

उपरोक्त नियमानुसार श्री. कर्डीले यांना एक वर्षाचा परिवीक्षाधीन कालावधी पूर्ण झालेनंतर पहिली वेतनवाढ देण्यात आलेली आहे.

तरी श्री. प्रल्हाद गोरक्षनाथ कर्डीले आचारी यांचे बाबत अधिक्षक प्रसादालय यांचे अभिप्राय विचारात घेता श्री कर्डीले यांना वेतन बँड रु.४४४०-७४४० ग्रेडवेतन रु.१६०० मध्ये आचारी या पदावर त्याचा परिवीक्षाधीन कालावधी संपुष्‍ठात आणून दि.०७/०८/२०१० पासून संस्थान सेवेत कायम करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.३७८ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री. प्रल्हाद गोरक्षनाथ कर्डीले आचारी यांचे बाबत अधिक्षक प्रसादालय यांचे अभिप्राय विचारात घेता श्री कर्डीले यांना वेतन बँड रु.४४४०-७४४० अधिक ग्रेडवेतन रु.१६०० मध्ये आचारी या पदावर त्याचा परिवीक्षाधीन कालावधी संपुष्‍ठात आणून दि.०७/०८/२०१० पासून संस्थान सेवेत कायम करणेत यावे असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**विषय नं.२०. मयत अनुकंपा तत्वावर नेमलेले वर्ग-०४ कर्मचारी श्री चेतन चांगदेव साबळे यांची सेवा पूढे चालू ठेवणे व वेतनबँण्ड देणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री. चेतक चांगदेव साबळे, यांची मदतनीस (वर्ग-४ चे कर्मचारी) या पदावर दोन वर्षाचे परिवीक्षाधीन कालावधीसाठी सर्व मिळून दरमहा रु.२०००/- (रु. दोन हजार मात्र) चे नियत वेतनावर नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यानुसार दि.१७/११/२००९ रोजी प्रसादालय विभागात कामावर हजर झाले त्यानंतर त्यांची बदली संरक्षण विभागाकडे झाली असून ते दि. १२/०९/२०११ रोजी संरक्षण विभागाकडे हजर झाले असून सध्या ते संरक्षण विभागाकडे काम करीत आहेत. त्यांचा एक वर्षाचा परिवीक्षाधीन कालावधी सपंल्यानंतर त्यांना सध्या दरमहा रु.२५००/- नियत वेतन आदा करण्यात येत आहे. त्यांचा तपशिल खालील प्रमाणे-

| अ. नं. | कर्मचा-याचे नांव व हुद्दा | शिक्षण | नेमणूक तारीख | परिवीक्षाधीन कालावधी संपण्याची तारीख | वैद्यकिय पात्रता | संस्थान सेवेत कायम करणेची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. चेतक चांगदेव साबळे<br>वर्ग-०४ कर्मचारी संरक्षण | ११ वी पास | १७/११/२००९ | १६/११/२०११ | ०२/१२/२००९<br>प्रमाणपत्रानुसार पात्र | १७/११/२०११ |

उपरोक्त श्री.चेतक चांगदेव साबळे, वर्ग-०४ कर्मचारी हे प्रसादालय विभागाकडे दि.१७/११/२००९ ते दि.११/०९/२०११ या कालावधी मध्ये नेमणूकीस असतांना त्यांचे काम समाधानकारक होते व ते हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करीत होते. सदर कालावधी मध्ये त्यांचे बाबत कोणतीही प्रकरणे चालू नव्हती. तसेच संरक्षण विभागाकडे श्री. साबळे हे दि.१२/०९/२०११ पासून काम करीत असून त्यांची काम व वर्तणूक चांगली आहे ते हुकमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात. त्यांचे बाबतीत कोणतेही प्रकरण चालू किंवा प्रस्तावित नाही. त्यांना वेतनबँन्ड देऊन त्यांची सेवा पुढे चालू ठेवण्यास हरकत नाही असे अभिप्राय अधिक्षक प्रसादालय व संरक्षण अधिकारी यांनी दिले आहेत.

शासन निर्णय क्र.सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का.सोळा मंत्रालय मुंबई दि.०७ ऑगष्ट २००९ नुसार श्री साईबाबा संस्थान कर्मचारी आकृतीबंधास मान्यता मिळालेली आहे. त्यात वर्ग-०४ चे १२४७ स्थायी पदांना मंजूरी असून सध्या संस्थान आस्थापनेवर १३९२ इतके वर्ग-०४ चे कर्मचारी आहेत. त्यांना सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन बँड रु.४४४०-७४४० + ग्रेडवेतन रु.१३००/- देण्यात आलेला आहे. म्हणजेच आकृतीबंधातील मंजूर वर्ग-०४ कर्मचारी संख्येपेक्षा १४५ वर्ग-०४ कर्मचारी जादा आहेत व त्यांना वेतन बँड रु.४४४०-७४४० + ग्रेडवेतन रु.१३००/- देण्यात आलेला आहे.

उपरोक्त परिस्थीती विचारात घेता श्री. चेंतक चांगदेव साबळे वर्ग-४ कर्मचारी संरक्षण विभाग यांचे बाबत अधिक्षक प्रसादालय व संरक्षण अधिकारी यांचे अभिप्राय विचारात घेता त्यांना त्यांचे नांवासमोर दर्शविलेल्या तारखेपासून वेतन बँड रु.४४४०-७४४० + ग्रेडवेतन रु.१३००/- देऊन त्यांची सेवा पुढे चालू ठेवता येईल. व भविष्यात पदोन्नती तसेच इतर कारणामुळे रिक्त होणा-या वर्ग-०४ चे पदावर सामावून घेता येईल.

**निर्णय क्र.३७९ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री. चेंतक चांगदेव साबळे वर्ग-४ कर्मचारी संरक्षण विभाग यांचे बाबत अधिक्षक प्रसादालय व संरक्षण अधिकारी यांचे अभिप्राय विचारात घेता त्यांना दिनांक १७/११/२०११**

**पासून वेतन बॅंड रु.४४४०-७४४० + ग्रेडवेतन रु.१३००/- देऊन त्यांची सेवा पुढे चालू ठेवण्यात यावी व भविष्यात पदोन्नती तसेच इतर कारणामुळे रिक्त होणा-या वर्ग-०४ चे पदावर सामावून घेण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२१.** **श्री साईबाबा हॉस्पिटलकडील पॅरामेडीकल व सोशल वर्कर या पदावरील कर्मचाऱ्यांचा परिविक्षाधीन कालावधी संपूष्टात येत असल्याने त्यांना संस्थान सेवेत कायम करणे बाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.०७/०८/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६६२ नुसार खालील उमेदवारांची संबंधीत पदांवर निवड करुन त्यांना वेतनबॅन्ड देऊन एक वर्ष परिविक्षाधीन कालावधीसाठी स्थायी पदावर तात्पुरत्या नेमणूका करण्यात आलेल्या आहेत. सदर कर्मचाऱ्यांचा एक वर्ष परिविक्षाधीन कालावधी संपुष्टात आल्याने त्यांची सेवा पुढे चालू ठेऊन कायम करणेबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दि. २४/०९/२०११ रोजीचे सभेमध्ये प्रस्ताव सादर करण्यात आला होता. यावर निर्णय क्र. ७४२ नुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे. श्री साईबाबा हॉस्पीटलकडील पॅरामेडिकल कर्मचाऱ्यांना संस्थान सेवेत कायम करणेबाबत सविस्तर अभ्यास करुन फेर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी सादर करावा. असे ठरले आहे.

त्यानुसार खालील कर्मचाऱ्यांनी वर्षभरात केलेल्या कामकाजाचा अहवाल संबंधीत विभाग प्रमुख यांचेकडून मागविण्यात आलेला आहे. त्याचा थोडक्यात तपशील पुढीलप्रमाणे-

| अ.नं | नाव व हुद्दा | हजर तारीख | परिविक्षाधीन कालावधी संपुष्टात येत असलेची तारीख | कामाचा तपशील |
|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** |
| १ | **श्री दिलीप धोंडीबा शिंदे** बायोकेमिस्ट | ०१/०९/२०१० | १५/०९/२०११ | श्री दिलीप शिंदे हे बायोकेमिस्ट्री विभागामध्ये रक्ताच्या विविध बायोकेमिकल तपासण्या करतात. उदा. ग्लुकोज लिव्हर फंक्शन टेस्ट, लिपीड प्रोफाईल्स, बॉडी फ्लुड्स, सीएसएफ फ्लुडस इत्यादी. त्याचप्रमाणे बायपास शस्त्रक्रीया करावयाची असल्यास रक्तातील विविध गॅसची (ABG) तपासणी करणे. उदा. ऑक्सीजन, कार्बन डाय ऑक्साइड, सोडीअम, पोटॅशिअम, कॅल्सिअम इत्यादी. एक्सटर्नल क्वालिटी कंट्रोल शाम्पलचे संपूर्ण बायोकेमिकल तपासण्या सेमी बायोकेमिस्ट्री मशिनवर व फुल्ली लोडेड बायोकेमिस्ट्री मशिनवर करणे व सदर तपासणीचे रिपोर्ट CMCVELLORE, Chennai या संस्थेकडे पाठविणे. सीएमसी व्हेल्लोर यांचेकडील रिझल्टची आपल्या टेस्टचे रिझल्टची तुलना करुन टेस्टमध्ये तफावत असल्यास योग्य ती सुधारणा करणे. तसेच दररोज इंटर्नल क्वालिटी कंट्रोल उदा. ग्लुकोज, किडनी फंक्शन टेस्ट इत्यादी तपासण्या दोन्ही मशिनवर एकच शांम्पल करणे व आलेल्या रिझल्टची नोंद ठेवणे. फुल्ली लोडेड बायोकेमिस्ट्री मशिनवर सर्व बायोकेमिकल तपासण्यांचे स्टॅंडर्ड शॅम्पल टाकून कॅलिब्रेशन करणे. सर्व बायोकेमिस्ट्रीचे रिपोर्ट काळजीपुर्वक तपासून रिपोर्टींग करणे. बायोकेमिस्ट्री विभागात दररोज १०० ते १२५ ग्लुकोजच्या टेस्ट, १०० ते १२५ रिन फंक्शन टेस्ट व ७० ते ८० किडनी फंक्शन टेस्ट होतात. तसेच लिपीड प्रोफाईलच्या १० ते १५ टेस्ट होतात, सी के एम बी च्या १० ते १५ टेस्ट होतात. इतर विविध प्रकारच्या ४० ते ५० तपासण्या दररोज होतात. तसेच ६० ते ७० एबीजी शॅम्पल्स तपासल्या जातात. म्हणजे सरासरी दररोज बायोकेमिकल ३०० ते ४०० तपासण्या होतात.<br>तसेच सर्व बायोकेमिस्ट्री मशिनच्या दररोजचा मेंटेनन्स करणे म्हणजेच मशिनला क्लिनर सोलुशन देणे. बायोकेमिस्ट्री रिएजंट फिलप करणे. त्यानंतर रिएजंटची क्वालिटी चेक करणे. |
| २ | **श्रीमती कल्पना दिनेश पुलाटे** (श्रीमती ललगे कमल जनार्दन) हिस्टोपॅथ तंत्रज्ञ | २०/०८/२०१० | १०/०९/२०११ | श्रीमती कल्पना पुलाटे ह्या हिस्टोपॅथ विभागामध्ये सायटोलॉजी व हिस्टोपॅथॉलॉजी स्लाईड तयार करणे स्लाईड तयार करणेसाठी ब्लॉक तयार करणे. त्या ब्लॉकचे कटींग करणे, डिव्हॅक्सींग करणे, स्लाईड स्टेन करणे, स्लाईड माऊंटींग करणे, लेबल करुन रिपोर्टीगसाठी देणे. एक स्लाईड तयार करणेसाठी साधारणतः ४ ते ५ दिवस लागतात. एक दिवसात ६ ते ७ सॅम्पल येतात. तसेच सायटॉलॉजीमध्ये एफएनएसीच्या स्लाईड तयार करणे. सदर स्लाईड स्टेन करुन रिपोर्टीगसाठी देणे. फ्ल्युईडच्या स्लाईड तयार करुन स्टेन करुन रिपोर्टीगसाठी देणे. एक दिवसात साधारणतः ३ ते ४ सॅम्पल येतात. या सर्व हिस्टोपॅथॉलॉजी व सायटोलॉजी स्लाईडची व रिपोर्टीगचे नंबरप्रमाणे फाईलींग करुन ठेवणे.कॅन्सरचे ब्लॉक्स व स्लाईड्स वैद्यकिय अधिकारी यांचे सल्ल्याने रुग्णांना पुढील तपासणीसाठी देणे. हिस्टॉपॅथच्या एका रुग्णाच्या साधारणतः ८ ते १० स्लाईड तयार कराव्या लागतात. या प्रमाणे एक दिवसात ६ ते ७ सॅम्पलप्रमाणे साधारणतः ४० ते ४५ स्लाईडस् होतात. सायटॉलॉजीमध्ये एफएनएसीच्या एका रुग्णाच्या ८ ते ९ स्लाईडस् तयार कराव्या लागतात तसेच फ्ल्युईडच्या ४ ते ५ स्लाईड तयार केल्या जातात. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | याप्रमाणे एका दिवसात २० ते २५ स्लाईड तयार होतात. |
| ३ | **थेटे रविंद्र पांडुरंग** वरिष्ठ कॅथलॅब टेक्निशियन | २३/०८/२०१० | १६/०९/२०११ | श्री थेटे यांनी एक वर्षाच्या कालावधीमध्ये कार्डीयोलॉजीस्ट यांना किमान ३६०१ कार्डीयाक कॅथलॅब प्रोसिजरमध्ये साहाय्य केलेले आहे. यात कोरोनरी एन्जीओग्राफ (CAG) २०८३, कोरोनरी एन्जीओप्लॅस्टी (PTCA) ९५३, बलून मायट्रल व्हाल्व्हो प्लास्टी (BMV)३२३, टेम्परी व परमनंट पेसमेकर (TPM,PPI) ९२, डिव्हाईस क्लोजर ऑफ (ASD,VSD,,PDA) ६५ Renal Angioplasty (PTRA) ४१ या व्यतिरिक्त रुग्णांची माहिती संगणकामध्ये फिडींग करणे, रुग्णांच्या आजाराची सीडी तयार करणे व मेडिकल रेकॉर्डच्या नोंदी ठेवणे. आदि. कामे करत आहेत. |
| ४ | **कु. जयश्री साहेबराव ससे** समाजसेवक / सोशल वर्कर | २४/०८/२०१० | १९/०९/२०११ | कु. जयश्री ससे व  कु. सोनाली नागपूरे यांना रुग्णलायात येणारे रुग्ण व त्यांचे नातेवाईक यांना रुग्णालयात येणाऱ्या अडचणी सोडविणे, रुग्णालयातील सेवा-सुविधा, अनुदान इ. बाबतची माहिती देऊन यासाठी मदत करणे. इत्यादी कामे सोपविण्यात आलेली आहे. ओपीडी विभागात अर्थिक अनुदानाबाबत माहिती घेण्यासाठी येणाऱ्या रुग्ण किंवा त्यांचे नातेवाईकांना संबंधीत माहिती देऊन कागदपत्र पूर्ततेसाठी मदत करतात. रुग्णांना अॅडमिशनच्या वेळी येणाऱ्या अडचणी सोडविणे, वॉर्डमध्ये राऊंड घेऊन रुग्णांच्या समस्या वैद्यकिय संचालक, प्रशासक यांना सांगणे. अॅडमिट असलेल्या ज्या रुग्णांची पैसे भरण्याची कुवत नाही अशा रुग्णांना अनुदानाकरीता आवश्यक कागदपत्रांची माहिती देऊन अनुदान मिळवून देणेकरीता मदत करणे. अॅडमिट असलेले ज्या गरीब रुग्णांना औषधे बाहेरुन आणणेची परिस्थिती नाही अशा रुग्णांना देणगीदारांकडून औषधोपचारासाठी मदत मिळवून देणे. अर्थिक दृष्ट्या गरीब रुग्णांना विविध धर्मदाय संस्थाकडून मदत मिळवून देणेसाठी प्रस्ताव तयार करुन पाठविणे. जीवनदायी योजनेबाबत रुग्ण व त्यांचे नातेवाईकांना योजनेबाबतची माहिती देऊन त्यासाठी प्रस्ताव तयार करुन जिल्हा रुग्णालयामध्ये मंजूरी मिळवून देणेबाबतचे मार्गर्शन करतात व यामध्ये येणाऱ्या अडचणींची सोडवणूक करतात. त्यांनी दि. २६/१२/२०१० ते दि. ३०/०८/२०११ या कालावधीत साधारणत: १५०० रुग्णांना जीवनदायी बाबत मार्गदर्शन करुन त्याबाबतचे प्रस्ताव तयार करुन दिलेले आहेत. |
| ५ | **कु. सोनल भिमराज नागपूरे,** समाजसेवक / सोशल वर्कर | २६/०८/२०१० | ०५/०९/२०११ | |
| ६ | **श्री. महेश रावसाहेब कसार** एस टी /एच ए फॉर बायोमेडीकल वेस्ट मॅनेजमेंट | ३०/०८/२०१० | ११/०९/२०११ | श्री महेश कसार यांना पुढीलप्रमाणे कामे नेमून दिलेली आहेत. संस्थानचे दोन्ही रुग्णालयांमध्ये पर्यावरण व वनरक्षक खाते मंत्रालय नवी दिल्ली यांनी जैविक वैद्यकिय निरुपयोगी व टाकाऊ वस्तूंचे विल्हेवाटीकरीता केलेल्या नियम अटी व कायदे पालनासाठी जारी केलेल्या अधिसूचनेनुसार जैव वैद्यकिय घनकचऱ्याचे निर्मिती, हाताळणी व व्यवस्थापन करणे, दोन्ही रुग्णालयांचे वार्षिक अहवाल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचेकडे सादर करणे, घनकचऱ्याचे निर्मीतीस्थळी माहिती पत्रक भिंतीचित्र व  सर्व वेस्टबीनला वेगवेगळ्या प्रकारचे कचऱ्यांचे वर्गीकरणासह स्टिकर्स व लेबल लावणे. रुग्णालयातील घनकचऱ्याचे व्यवस्थापन, हाताळणी, संकलन, विभक्तीकरण, स्विकार, साठा, वाहतुक, प्रक्रिया व विल्हेवाट नियमानुसार होणेसाठी परिचारीका, कर्मचारी यांना आवश्यक ते प्रशिक्षण व प्रात्यक्षिक वर्ग वेळोवेळी आयोजित करणे. दोन्ही रुग्णालयातील निघणारा व साठवला जाणारा जैविक घनकचरा महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे आदेशानुसार पुढील प्रक्रिया व विल्हेवाट लावणेकामी म.प्र.नि.मान्यता प्राप्त संस्था मे. बायोक्लिन सिस्टीम अहमदनगर यांचे वाहनातून दररोज नियमानुसार २४ तासाचे आत वाहून नेला जात असल्यामुळे दोन्ही रुग्णालयांमध्ये कुठल्याही प्रकारचा जैव वैद्यकिय घनकचरा शिल्लक राहत नाही याचे काटेकोर पालन करणे. अशा स्वरुपाचे कामकाज श्री कसार करत आहे. |

उपरोक्त कर्मचाऱ्यांच्या नेमणूका करतांना मंजूर आकृतीबंधातील अटी-शर्तीनुसार संबंधीत पदांसाठी आवश्यक असलेले मुलभूत कौशल्य तपासणेकामी त्यांची लेखी परिक्षा, प्रात्यक्षिक परिक्षा व तोंडी मुलाखती घेऊन संबंधीत पदासाठी मंजूर असलेल्या वेतनबॅन्डनुसार नेमणूका देण्यात आलेल्या आहेत.

उपरोक्त कर्मचाऱ्यांनी परिविक्षाधीन कालावधीत केलेल्या कामाचा सविस्तर अभ्यास केला असून सदरचे कालावधीत त्यांचे काम समाधानकारक असून सदरचे पदांची रुग्णालयास आवश्यकता असल्याने त्यांची सेवा पूढे चालू ठेवावी, असे वैद्यकिय संचालक यांनी सुचविले आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे मा. व्यवस्थापन समितीचे दि. २४/०९/२०११ रोजीचे सभेतील निर्णयानुसार उपरोक्त कर्मचाऱ्यांचे कामकाजाचा वैद्यकिय संचालक यांनी अभ्यास केलेला असून त्यांचे अभिप्रायाप्रमाणे उपरोक्त कर्मचाऱ्यांना संस्थान सेवेत कायम करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३८०** **यावर सविस्तर चर्चा होऊन,प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे, श्री साईबाबा हॉस्पिटलकडील पॅरामेडीकल व सोशल वर्कर या पदांवरील कर्मचाऱ्यांचा परिविक्षाधीन कालावधी संपूष्टात आल्याने त्यांचेबाबत वैद्यकीय संचालक यांचे अभिप्राय विचारात घेता, संबंधित कर्मचाऱ्यांना त्यांचे नावापुढे नमूद केलेल्या तारखेपासून संस्थान सेवेत कायम करण्यात यावे,असें ठरलें.**

| अ.नं. | कर्मचाऱ्याचे नाव | हुद्दा | संस्थान सेवेत कायम करण्याची तारीख |
|---|---|---|---|
| **०१** | **श्री दिलीप धोंडीबा शिंदे** | **बायोकेमिस्ट** | **१५.०९.२०११** |
| **०२** | **श्रीमती कल्पना दिनेश पुलाटे (श्रीमती ललगे कमल जनार्दन)** | **हिस्टोपॅथ तंत्रज्ञ** | **१०.०९.२०११** |
| **०३** | **थेटे रविंद्र पांडुरंग** | **वरिष्ठ कॅथलॅब टेक्निशियन** | **१६०९.२०११** |
| **०४** | **कु. जयश्री साहेबराव ससे** | **समाजसेवक / सोशल वर्कर** | **१९.०९.२०११** |
| **०५** | **कु. सोनल भिमराज नागपूरे** | **समाजसेवक / सोशल वर्कर** | **०५.०९.२०११** |
| **०६** | **श्री. महेश रावसाहेब कसार** | **एस टी /एच ए फॉर बायोमेडीकल वेस्ट मॅनेजमेंट** | **११.०९.२०११** |

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२२. मयत अनुकंपा तत्वावर नेमलेल्या वर्ग-०४ कर्मचाऱ्यांना वेतनबँण्ड देणे व सेवा पुढे चालू ठेवणेबाबत.**

**प्रस्ताव-** कारभारी पुंजा सोळसे यांचे संस्थान सेवेत असतांना निधन झाल्याने त्यांचा मुलगा -श्री साईनाथ कारभारी सोळसे तसेच राजेंद्र अशोक गोंदकर यांचे संस्थान सेवेत असतांना निधन झाल्याने त्यांचे जागी त्यांची पत्नी श्रीमती रंजना राजेंद्र गोंदकर यांच्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार मयत अनुकंपा तत्वावर प्रसादालय विभागाकडे वर्ग-४ चे कर्मचारी या पदावर दोन वर्षाचे परिवीक्षाधीन कालावधीसाठी सर्व मिळून दरमहा **रु.२०००/-** (रु. दोन हजार मात्र) चे नियत वेतनावर नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यानुसार ते कामावर हजर झाले असून त्यांचा एक वर्षाचा परिवीक्षाधीन कालावधी सपल्यानंतर त्यांना सध्या दरमहा रु.२५००/- नियत वेतन आदा करण्यात येत आहे. त्यांचेबाबत तपशिल खालील प्रमाणे

| अ. नं. | कर्मचा-याचे नांव व हुद्दा | शिक्षण | नेमणूक तारीख | परिवीक्षाधीन कालावधी संपण्याची तारीख | वैद्यकिय पात्रता | संस्थान सेवेत कायम करणेची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|
| **०१** | **०२** | **०३** | **०४** | **०५** | **०६** | **०७** |
| ०१ | श्री साईनाथ कारभारी सोळसे, वर्ग-०४ कर्मचारी | इ.१० वी पास | २२/०३/२०१० | २१/०३/२०१२ | ०६/०४/२०१० च्या प्रमाणपत्रानुसार पात्र | २२/०३/२०१२ |
| ०२ | श्रीमती रंजना राजेंद्र गोंदकर वर्ग-०४ कर्मचारी | अशिक्षीत | २२/०३/२०१० | २१/०३/२०१२ | ०६/०४/२०१० च्या प्रमाणपत्रानुसार पात्र | २२/०३/२०१२ |

"श्री साईनाथ कारभारी सोळसे व श्रीमती रंजना राजेंद्र गोंदकर वर्ग-४ कर्मचारी यांचे काम समाधानकारक असून ते हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात. त्यांचे बाबतीत कोणतेही प्रकरण चालू अथवा प्रस्तावीत नाही. त्यांना वेतनश्रेणी देऊन त्यांची सेवा पुढे चालू ठेवणेस हरकत नाही", असे अभिप्राय अधिक्षक प्रसादालय विभाग यांनी दिले आहेत

शासन निर्णय क्र.सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का.सोळा मंत्रालय मुंबई दि.०७ ऑगष्ट २००९ नुसार श्री साईबाबा संस्थान कर्मचारी आकृतीबंधास मान्यता मिळालेली आहे. त्यात वर्ग-०४ चे १२४७ स्थायी पदांना मंजूरी असून सध्या संस्थान आस्थापनेवर १३९२ इतके वर्ग-०४ चे कर्मचारी आहेत. त्यांना सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन बॅड रु.४४४०-७४४० + ग्रेडवेतन रु.१३००/- देण्यात आलेला आहे. म्हणजेच आकृतीबंधातील मंजूर वर्ग-०४ कर्मचारी संख्येपेक्षा १४५ वर्ग-०४ कर्मचारी जादा आहेत व त्यांना वेतन बॅड रु.४४४०-७४४० + ग्रेडवेतन रु.१३००/- देण्यात आलेला आहे.

उपरोक्त परिस्थीती विचारात घेता, श्री साईनाथ कारभारी सोळसे व श्रीमती रंजना राजेंद्र गोंदकर वर्ग-०४ कर्मचारी यांचे बाबत अधिक्षक प्रसादालय विभाग यांचे अभिप्राय विचारात घेऊन त्यांना त्यांचे नांवासमोर दर्शविलेल्या तारखेपासून (स्तभ क्र.०७) वेतन बॅड रु.४४४०-७४४० + ग्रेडवेतन रु.१३००/- देऊन त्यांची सेवा पुढे चालू ठेवता येईल. व भविष्यात पदोन्नती तसेच इतर कारणामुळे रिक्त होणा-या वर्ग-०४ चे पदावर सामावून घेता येईल.

**निर्णय क्र.३८१ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ कारभारी सोळसे व श्रीमती रंजना राजेंद्र गोंदकर वर्ग-०४ कर्मचारी यांचे बाबत अधिक्षक, प्रसादालय विभाग यांचे अभिप्राय विचारात घेऊन, त्यांना दिनांक २२.०३.२०१२ पासून वेतन बॅड रु.४४४०-७४४० + ग्रेडवेतन रु.१३००/- देऊन त्यांची सेवा पुढे चालू ठेवण्यात यावी व भविष्यात पदोन्नती तसेच इतर कारणामुळे रिक्त होणा-या वर्ग-०४ चे पदावर सामावून घेण्यात यावे,असें ठरलें.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

---

**विषय नं.२३. श्री साईनाथ रुग्णालयातील डॉक्टरांना इन्सेंटीव्ह देणे बाबत.**

**निर्णय क्र.३८२ सदरहू प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२४. श्रीरामपूर भू-संपादन कक्षास व या कक्षाकडे कंत्राटी पद्धतीने नेमलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांची मुदतवाढ व मानधनवाढ मिळणेबाबतचा अर्ज.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५-१६ व १७ जुलै २००० रोजीच्या सभेतील निर्णय क्र. २३८ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडीकरीता भूसंपादनाची कामे करणेकामी मा. उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर (महसूल) यांचे पर्यवेक्षणाखाली श्रीरामपूर येथे कक्ष स्थापन करणेत आलेला आहे. त्यानुसार सदर कक्षाकडे कामे करणेकामी खालील प्रमाणे कर्मचारी वृंद मंजूर करण्यात आलेला असून त्यांना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे वेतन/मानधन ठरविण्यात आले आहे.

| अ.नं. | तपशील | मागणी संख्या | देण्यात येत असलेले मानधन |
|---|---|---|---|
| ०१ | तहसिलदार संवर्गातील | ०१ | ७०००/- |
| ०२ | अव्वल कारकुन संवर्गातील कर्मचारी | ०२ | ५०००/- |
| ०३ | लिपीक संवर्गातील कर्मचारी (कुशल ) | ०२ | ४०००/- |
| ०४ | शिपाई | ०१ | २५००/- |
| ०५ | वाहन-चालक | ०१ | ४०००/- |

त्यानुसार सध्या सदर कक्षाकडे खालीलप्रमाणे कर्मचारी वृंद कामे पहात असून त्यांचे नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे वेतन/मानधन देण्यात येत आहे.

| अ.नं. | कर्मचा-यांचे नांव | सख्या | प्रति माह देण्यात येत असलेले मानधन |
|---|---|---|---|
| ०१ | श्री. बी.आर. वाव्हळ, सेवानिवृत्त नायब तहसीलदार | ०१ | ७०००/- |
| ०२ | श्री.रामचंद्र भा. नागरे अव्वल कारकून | ०१ | ४५००/- |
| ०३ | **कंत्राटदारामार्फत** लिपीक-टंकलेखक (संवर्ग ) | ०४ | दरमहा रु. ४०००/- ( प्रत्येकी ) |
| ०४ | **कंत्राटदारामार्फत** शिपाई | ० १ | किमान वेतनाप्रमाणे |

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४/०९/२०११ रोजीच्या सभेतील निर्णयानुसार सदर कक्ष व कक्षाकडील कंत्राटी पध्दतीने नेमणूका करण्यात आलेले कर्मचारी यांना देण्यात आलेली मुदतवाढ दि.३०/०४/२०१२ अखेर संपुष्ठात येत आहे.

सदर कक्षाकडे कत्राटी पध्दतीने नेमणका करण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचारी यांनी त्यांना मासिक एकत्रीत मानधनात वाढ मिळणेबाबत विनंती अर्ज केला होता. सदरचा अर्ज मा.व्यवस्थापन समितीचे दि. १४/०१/२०१२ रोजीचे सभेमध्ये सादर करण्यात आला होता त्यावेळी खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

**निर्णय :-१४०** "श्रीरामपूर भू-संपादन कक्षाकडे कंत्राटी पध्दतीने कंत्राटदारामार्फत कामे करत असलेल्या कुशल कर्मचा-यांची मानधन / वेतनवाढ मिळणेबाबतची विनंती अमान्य करण्यात आली.
उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग श्रीरामपूर यांना व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे बोलावून सध्या चालू असलेली भसंपादनाची कामे किती दिवसात पूर्ण होतील, याबाबत आढावा घेणेत यावा. "

आता, मा.उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर भाग श्रीरामपूर यांनी दि.१४/०४/२०१२ रोजी पत्र देऊन त्यात -

संस्थान साठी भसंपादन करणेकामी सन-२००० मध्ये भसंपादनाची ०९ प्रकरणे चालू होती. त्यापैकी ०३ प्रकरणांत अंतिम निवाडा घोषीत करुन ०२ प्रकरणात भूसंपादक संस्थेस ताबा दिला आहे. ०१ प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे उर्वरित ०६ प्रकरणा पैकी ०३ प्रकरणाचे प्रस्ताव वगळले आहेत. आज रोजी ०३ प्रकरणे प्रलंबित आहेत.

शिरडी नगरपंचायत हद्दीतील सुमारे २४.७४ किलोमिटर लांबीच्या २५ रस्त्यांची कामे महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ, पुणे यांचे मार्फत करावयाची आहेत. या रस्त्यासाठी लागणारा निधी ६५ ोटी अंदाजे श्री साईबाबा संस्थान यांनी उपलब्ध करुन द्यावयाचा आहे. असा करार शिरडी नगरपंचायत, श्री साईबाबा संस्थान शिरडी व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ पुणे यांचे मध्ये दिनांक १५/०६/२००६ रोजी झालेला आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यातील ११ रस्त्यापैकी १० रस्त्याचे भसंपादनाचे प्रस्ताव २००७ मध्ये या कार्यालयास प्राप्त झाले आहेत. या १० रस्त्यापैकी ०९ रस्त्याचे भूसंपादन निवाडे घोषीत करण्यात आले असून त्याचा ताबा ही भसंपादन संस्थेस दिला आहे. आता परत शिरडी मंजूर विकास योजनेतील दुस-या टप्प्यातील रस्त्यासाठी संपादन करावयाची ०६ प्रकरणे या कार्यालयास प्राप्त झाली आहेत.
शिरडी-राहाता बाहय वळण रस्त्यासाठी एकूण ०८ प्रकरणे प्राप्त झाली असून त्या ०८ ही प्रकरणात

भूसंपादन निवाडे घोषीत करुन भसंपादन संस्थेस म्हणजेच मा.कार्यकारी अभियंता जागतिक बँक प्रकल्प सा.बां.वि. अहमदनगर यांना ताबा दिलेला आहे. अहमदनगर कोपरगांव चौपदरीकरण व नुतनी करणाची ०६ प्रकरणे सन २००७ मध्ये प्राप्त झाली असून यापैकी ०२ प्रकरणात निवाडा घोषीत करण्यात आल असून त्याचा ताबा भसंपादन संस्थेस दिला आहे.

शिरडी नगरपंचायतीच्या हद्दीतील २५ रस्त्यापैकी आतापर्यंत फक्त १६ रस्त्याचे भसंपादन प्रस्ताव इकडेस प्राप्त झालेले आहे. उर्वरित ०९ प्रस्तावही या कार्यालयास प्राप्त होणार आहेत. शिरडी विकास योजनेतील रस्त्याची भूसंपादन प्रकरणे युध्दपातळीवर हताळणेकामी कर्मचा-यांची निकड आहे.

या सर्व प्रकरणांचा जलद गतीने निपटारा करणेकामी या भूसंपादन कक्षाची या कार्यालयास आवश्यकता आहे. सबब आपण या कक्षास दि.०१/०५/२०१२ ते ३०/०४/२०१३ अखेर मुदतवाढ मिळणे विनंती.

तसेच सदर कक्षाकडे कंत्राटी पध्दतीने कामे करणारे कर्मचारी ०१) श्री. बी.आर. वाव्हळ, सल्लागार दरमहा एकत्रित रु.११,०००/- व श्री. आर.बी. नागरे, अव्वल कारकून यांनी दरमहा एकत्रित रु.१०,०००/- इतके मानधन मिळणेबाबत विनंती केली असून सध्या देत असलेले मानधनावर काम करण्याची इच्छा नाही असे नमूद केले आहे. तसेच कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने नेमणूका करण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचारी यांनी एकत्रित वेतनाऐवजी किमान वेतना दराने वेतन मिळणेबाबत विनंती केली आहे. त्यानुसार संबंधीतांना मानधन वाढवून देणेबाबत मा. उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर यांनी शिफारस केली आहे.

मा.उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर भाग श्रीरामपूर यांचे कार्यालयातील भूसंपादन कक्षास व सदरहू कक्षाकडील कर्मचा-यांना तूर्त ०१ वर्षासाठी (दि.०१/०५/२०१२ ते ३०/०४/२०१३) मुदतवाढ देणेस हरकत नाही असे अभिप्राय वरिष्ठ मुख्य अभियंता बांधकाम यांनी दिले आहेत.

उपरोक्त उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर भाग श्रीरामपूर यांचे पत्रातील विनंती व वरिष्ठ मुख्य अभियंता बांधकाम विभाग यांचे अभिप्राय विचारात घेऊन सदर कक्षास मुदतवाढ तसेच मानधन वाढीबाबत चे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३८३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीरामपूर भू-संपादन कक्षास व या कक्षाकडे कंत्राटी पद्धतीने नेमलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना दि.१.०५.२०१२ ते दि.३१.१०.२०१२ अखेर सहा महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी तसेच, या कक्षाकडे कंत्राटी पद्धतीने काम करणारे कर्मचारी श्री.बी.आर.वाव्हळ, सल्लागार यांना दरमहा रुपये १०,०००/- व श्री.आर.बी.नागरे,अव्वल कारकून यांना दरमहा रुपये ७०००/- एकत्रित मानधन देण्यात यावे. तसेच कंत्राटी पद्धतीने लिपिक-टंकलेखक पदावर काम करणाऱ्या कंत्राटी कामगारास कुशलचे वेतन देण्यात यावे.**

**तसेच, सध्या या कक्षासाठी देण्यात आलेला संगणक संच खुपच जुना झालेला असल्याने तो बदलून त्याऐवजी नविन संगणक संच देण्यात यावा,असें ठरलें.**

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना/बांधकाम विभाग प्रमुख/आय.टी.विभाग प्रमुख)

---

**विषय नं.२५.** **संस्थान सेवेत हजर करुन घेणेबाबत श्री.देवकुमार साळवे, यांचा अर्ज.**

**प्रस्ताव-** श्री देवकुमार शंकर साळवे हे "निदेशक, टुल ॲण्ड डायमेकर" परंतू प्रत्यक्ष काम, पर्यवेक्षक, या पदावर श्री साईबाबा भक्तनिवासस्थान या विभागाकडे कार्यरत होते. त्यांचेवरील गंभीर स्वरुपाच्या आरोपाबाबत त्यांचेवर आरोपपत्र ठेवून त्यांची खाते निहाय चौकशी करुन त्यांना दि. ०१/०८/२०११ पासुन संस्थान सेवेतुन बडतर्फ करण्यात आलेले आहे.

श्री साळवे यांची संस्थान सेवेत हजर झाल्याची तारीख १८/०९/१९९६ अशी असून, संस्थानमध्ये त्यांची एकुण १४ वर्षे सेवा झालेली आहे. त्यांचे वय ४० वर्षे आहे.

श्री देवकुमार साळवे यांनी दि. १५/०३/२०१२ रोजीचा विनंती अर्ज सादर केलेला आहे. त्यात त्यांनी असे म्हटले आहे की, खाते चौकशी करुन मला कामावरुन कमी केले आहे. माझा दोष वाटत असेल तर मला महोदयांनी क्षमा करावी व पूर्ववत मागील सेवा सलग धरुन कामावर हजर करुन घ्यावे. माझी चुक झाली असेल असे वाटत असल्यास क्षमा करावी व माझी सेवा सलग धरुन पगारात कोणताही फेरबदल न करता पदाचे वेतन व फायदे यांचे लाभ मला मिळावेत. तसेच पदोन्नती दया किंवा नका देवू पण मागील पदावर कामावर हजर करुन घ्या.

**श्री साळवे यांचा संस्थान सेवेतील पूर्व इतिहास खालीलप्रमाणे आहे -**

श्री देवकुमार शंकर साळवे यांनी वरिष्ठांचे योग्य आज्ञेचे पालन न करणे, जाणून बूजुन उद्दामपणा करणे, विनापरवानगी गैरहजर राहून नंतर उशिराने रजा अर्ज सादर करणे, वरिष्ठांना उलट उध्दट उत्तरे देणे, वरिष्ठांशी व सहकर्मचाऱ्यांशी वाद घालणे, कामावर असतांना विनापरवानगी योग्य कारणाशिवाय कामाची जागा सोडणे, वरिष्ठांना उपरोधात्मक भाषा वापरुन दमबाजी करणे, अनेकवेळा शासन झालेले असतांनाही तशाच प्रकारच्या गैरवर्तनाची पुनरावृत्ती करणे अशाप्रकारची गंभीर स्वरुपाची गैरवर्तने केलेली आहेत. त्याबद्दल त्यांचेवर जा. नं. एसएसएस/वशी ७ए/३२२/२००६ दि. ०२/०२/२००६ अन्वये आरोपपत्र बजावण्यात आलेले होते व सदरच्या आरोपपत्रातील आरोपांची चौकशी करणे कामी ॲड. बी. वाय. काळवाघे, कोपरगाव यांची खाते चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली होती. त्यांनी नियमाप्रमाणे खाते चौकशी करुन दि. २३/१२/२०१० रोजीचा निष्कर्ष अहवाल सादर केलेला आहे. खाते चौकशीमध्ये त्यांचेवरील आरोप शाबीत झाल्याने श्री साळवे दोषी आढळून आले आहेत. असा खाते चौकशी अधिकारी यांनी निष्कर्ष अहवाल सादर केलेला आहे.

सदर प्रकरणी श्री साळवे यांना करावयाच्या शिक्षेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि. १२/०६/२०११ रोजीचे सभेत सादर केला होता. त्यानुसार सभेमध्ये निर्णय क्र. ४३९ अन्वये श्री साळवे यांना स्थायी आदेशाचे कलम २५ (१) (ड) नुसार नोटीशी शिवाय बडतर्फ करावे असा निर्णय झालेला आहे.

मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णयानुसार दि. ३०/०७/२०११ रोजीच्या आदेशान्वये श्री साळवे यांना दि. ०१/०८/२०११ पासून संस्थान सेवेतून बडतर्फ केलेले आहे. त्यानंतर श्री साळवे यांनी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपिठ, औरंगाबाद यांचेसमोर रिट पिटीशन क्र. ५९०९/२०११ दाखल केले होते. सदरचे रिट पिटीशन दि. १३/०९/२०११ रोजी श्री साळवे यांनी (विड्रावल) काढून घेतले आहे. त्यानंतर मा. उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार श्री साळवे यांनी मा. कामगार न्यायालय, अहमदनगर यांचेसमोर तक्रार क्र. ३४/२०११ दाखल केलेली आहे. सदर तक्रार अर्जासोबत पुन्हा कामावर हजर करुन घेणेबाबत अंतरीम आदेशासाठी श्री साळवे यांनी मा. न्यायालयासमोर अर्ज दाखल केला होता. दि. ३०/१२/२०११ रोजी मा. न्यायालयाने श्री साळवे यांचा पुन्हा कामावर हजर करुन घेणेबाबत अंतरीम आदेशासाठीचाअर्ज नामंजूर केलेला आहे.

श्री साळवे यांना संस्थान सेवेत असतांना विविध प्रकारच्या गैरशिस्त वर्तनाबद्दल ३७ वेळा शासन झालेले आहे. त्यापैकी ८ वेळा विभागप्रमुख/वरिष्ठ अधिकारी यांना उलट, उध्दट उत्तरे देणे, उपरोधात्मक भाषा वापरुन दमबाजी करणे, अरेरावीच्या भाषेत जीवे मारण्याची धमकी देणे यासाठी शासन झालेले आहे. श्री साळवे यांची पूर्ववत कामावर घेण्याबाबतची तक्रार क्र. ३४/२०११ मूळ अर्ज मा. कामगार न्यायालय, अहमदनगर यांचेसमोर निर्णयासाठी प्रलंबीत असून न्यायप्रविष्ट आहे.

तरी पूर्ववत कामावर हजर करुन घेण्याबाबतचे श्री साळवे यांचे अर्जाबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३८४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानने एखाद्या कर्मचाऱ्यास,संस्थान सेवेतून बडतर्फ (डिसमीस) केल्यास सदरहू कर्मचारी हा संस्थान कर्मचारी म्हणून गणला जात नाही. तसेच अशा कर्मचाऱ्यास पुन्हा संस्थान सेवेत घेणेबाबत संस्थान सेवा-नियमात तरतूद नाही.**

**तसेच,श्री.साळवे यांना त्यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत ३७ वेळा शासन झाले, त्यांचेबाबत खाते चौकशी होऊन,आरोप शाबीत झाल्याने त्यांना संस्थान सेवेतून बडतर्फ करण्यात आलेले आहे. या सर्व बाबींचा विचार करता, श्री.साळवे यांची पुन्हा संस्थान सेवेत घेणेबाबतची विनंती अमान्य करण्यात आली.** (कार्यवाही-कामगार अधिकारी/वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२६.** **श्री.लक्ष्मण यशवंत पेटारे,सफाई कामगार,आरोग्य विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.लक्ष्मण यशवंत पेटारे, सफाई कामगार, आरोग्य विभाग हे दि.०६-०३-१९८९ पासून संस्थान सेवेत वर्ग ४ चे कर्मचारी म्हणून कामास आहे.श्री.पेटारे हे आरोग्य विभागात सफाई कामगार म्हणून कार्यरत असतांना त्यांचेकडून दि.२७-०६-२०१० ते दि.१८-०१-२०११ या कालावधीत खालीलप्रमाणे गैरशिस्तवर्तन घडलेले आहे.

श्री.लक्ष्मण यशवंत पेटारे, सफाई कामगार, आरोग्य विभाग हे दि.२७-०६-२०१० ते दि.२८-०६-२०१०, दि.३०-०६-२०१०, दि.०२-०७-२०१० ते दि.०४-०७-२०१०, दि.१२-०७-२०१०, दि.१४-०७-२०१० ते दि.१५-०७-२०१०, दि.२७-०७-२०१० ते दि.२८-०७-२०१०, दि.०८-०८-२०१०, दि.११-०८-२०१०, दि.१७-०८-२०१०, दि.२३-०८-२०१० ते दि.२४-०८-२०१०, दि.२७-०८-२०१०, दि.३०-०८-२०१०, दि.०५-०९-२०१०, दि.०८-०९-२०१०, दि.२४-११-२०१०, दि.२९-११-२०१०, दि.०१-१२-२०१० ते दि.०२-१२-२०१०, दि.०९-१२-२०१० ते दि.१०-१२-२०१०, दि.१५-१२-२०१०, दि.१९-१२-२०१०, दि.२२-१२-२०१०, दि.२६-१२-२०१०, दि.२९-१२-२०१०, दि.३१-१२-२०१०, दि.०९-०१-२०११, दि.११-०१-२०११ व दि.१८-०१-२०११ या कालावधीत **एकूण-३५ दिवस** पुर्व परवानगीशिवाय व रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले आहे. त्यामुळे कामाची गैरसोय झाली. श्री.पेटारे यांना विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहण्याची सवयच झालेली आहे. श्री.पेटारे यांचे सदरचे कृत्य हे बेकायदेशीर असून, गंभीर गैरशिस्त वर्तनात मोडते.

म्हणून उपरोक्त गैरशिस्त वर्तनाबाबत श्री.पेटारे यांना अनुक्रमे जा.नं.एसएसएस/वशी-७ए/४१३५/२०१० दि.३१-०७-२०१०,जा.नं.एसएसएस/वशी-७ए/४०२४/२०१० दि.२४-०७-२०१०, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/ ४२८७/ २०१० दि.११-०८-२०१०, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/४५०८/२०१० दि.२८-०८-२०१०, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/ ४६२३/२०१० दि.०३-०९-२०१०, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/४७८९/२०१० दि.१५-०९-२०१०, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/६५१२/२०१० दि.३०-१२-२०१० व जा.नं.एसएसएस/वशी-७ए/६९४३/२०११ दि.२७-०१-२०११ अन्वये कारणे दाखवा नोटीसा काढून, त्यांचे लेखी खुलासे मागविणेत आले होते. तथापि, श्री.पेटारे यांना सदर कारणे दाखवा नोटीसा अनुक्रमे दि.०२-०८-२०१०, दि.२६-०७-२०१०, दि.१३-०८-२०१०, दि.३०-०८-२०१०, दि.०१-०९-२०१०, दि.१७-०९-२०१० व दि.०४-०१-२०११ रोजी प्राप्त होऊन देखील त्यांनी लेखी खुलासे सादर केलेले नाहीत. यावरून सदर गैरशिस्त वर्तन केल्याचे त्यांना मान्य असल्याचे दिसून येते.

म्हणून श्री.पेटारे यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/७१७५/२०११ दि.१४-०२-२०११ अन्वये आरोपपत्र देवून, त्यांचेवर दि.इंडस्ट्रियल एम्प्लॉयमेंट (स्टँडींग ऑर्डर्स) ॲक्ट १९४६ चे कलम नंबर २४ (एफ) प्रमाणे

नेहमी नेहमी रजेशिवाय गैरहजर राहणे किंवा रजेशिवाय सलग १० पेक्षा जास्त दिवस गैरहजर राहणे, कलम नंबर २४ (एल) प्रमाणे आस्थापनेच्या जागेत शिस्तीला व सद्वर्तनाला बाधक ठरेल असे कोणतेही कृत्य करणे याप्रमाणे आरोप ठेवणेत आले होते.

श्री.लक्ष्मण यशवंत पेटारे, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचे विरूध्द दि.१४-०२-२०११ रोजी ठेवणेत आलेल्या आरोपपत्रातील आरोपांची खाते चौकशी ॲडव्होकेट श्री.बी.वाय.काळवाघे, कोपरगांव, खातेचौकशी अधिकारी यांनी पूर्ण करून, त्यांचा दि.३१-०३-२०१२ रोजीचा खाते चौकशी निष्कर्ष अहवाल संस्थानला सादर केला आहे. त्यात त्यांनी खालीलप्रमाणे निष्कर्ष काढलेला आहे.

**आदेश-**

श्री.लक्ष्मण यशवंत पेटारे, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचेवरील आरोप शाबीत झाल्याने ते दोषी आहेत. श्री.पेटारे यांनी दि.इंडस्ट्रियल एम्प्लॉयमेंट (स्टॅंडींग ऑर्डर्स) ॲक्ट १९४६ चे कलम नंबर २४ (एफ) व २४ (एल) नुसार गैरशिस्तवर्तन केले आहे.

श्री.लक्ष्मण यशवंत पेटारे, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांनी यापूर्वी केलेल्या गैरशिस्त वर्तनाचा तपशिल व त्यांना यापुर्वी करणेत आलेल्या शिक्षेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**१)** श्री.पेटारे हे दि.१३-०८-१९८९ रोजी विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.१६-०९-१९८९ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **ताकीद** देणेत आली.

**२)** श्री.पेटारे हे दि.१९-०१-१९९० रोजी विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.३०-०१-१९९० रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

**३)** श्री.पेटारे हे दि.२४-०१-१९९३ रोजी विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले म्हणून त्यांना दि.०१-१२-१९९३ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **रूपये १०/- दंड** करणेत येऊन, **ताकीद** देणेत आली.

**४)** श्री.पेटारे हे दि.१६-०७-१९९५, दि.२४-०७-१९९५, दि.३०-०७-१९९५, दि.२६-०८-१९९५, दि.०१-०९-१९९५, दि.०२-११-१९९५, दि.२६-११-१९९५, दि.०३-१२-१९९५ व दि.०७-१२-१९९५ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.१०-०८-१९९६ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

**५)** श्री.पेटारे हे दि.१८-१२-१९९६ रोजी ड्युटीवर असतांना त्यांनी साफ-सफाईची कामे केलेली नव्हती., म्हणून त्यांना दि.१०-०९-१९९७ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून दोन दिवसांचे वेतनाइतका दंड करणेत आला.

**६)** श्री.पेटारे यांनी दि.०२-०६-२००० रोजी यांनी वरिष्ठांशी वाद-विवाद घातला व उध्दट भाषेत बोलले. म्हणून त्यांना दि.१७-०५-२००१ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **ताकीद** देणेत आली.

**७)** श्री.पेटारे हे दि.२६-१२-२००७, दि.३१-१२-२००७, दि.०५-०१-२००८ व दि.१४-०१-२००८ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीलेत. म्हणून त्यांना दि.१६-०५-२००८ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **ताकीद** देणेत आली.

**८)** श्री.पेटारे हे दि.२४-०२-२००८ ते दि.२५-०२-२००८, दि.०९-०३-२००८, दि.११-०३-२००८ ते दि.१५-०३-२००८ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.१६-०५-२००८ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **ताकीद** देणेत आली.

**९)** श्री.पेटारे यांचे गैरहजेरीचे प्रमाण जास्त असून, काम वाटपाचे ठिकाणी कर्मचाऱ्यांसमोर वरिष्ठांशी वाद-विवाद घालणे, आरेरावीची भाषा वापरणे या गैरशिस्त वर्तनाबाबत त्यांना दि.३१-१२-२००८ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

**१०)** श्री.पेटारे हे दि.१६-०३-२००९ ते दि.१९-०३-२००९ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.३०-०४-२००९ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **ताकीद** देणेत आली.

**११)** श्री.पेटारे हे दि.१५-०६-२००९ ते दि.२२-०६-२००९ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.२५-०८-२००९ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **ताकीद** देणेत आली.

**१२)** श्री.पेटारे हे दि.२७-०५-२००९ रोजी ड्युटीवर झोपलेले होते, तसेच दि.०१-०६-२००९ रोजी विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.१५-०९-२००९ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **संस्थान सेवेतून दोन दिवस तात्पुरते सेवा निलंबीत करणेत आले.**

**१३)** श्री.पेटारे हे दि.१६-०९-२०१० रोजी विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.२०-१०-२०१० रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

**१४)** श्री.पेटारे हे दि.२९-०९-२०१०, दि.०३-१०-२०१०, दि.०५-१०-२०१० ते दि.०६-१०-२०१० या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.१०-११-२०१० रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

**१५)** श्री.पेटारे हे दि.०८-१०-२०१०, दि.१४-१०-२०१०, दि.१८-१०-२०१० व दि.२०-१०-२०१० या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.२९-११-२०१० रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **ताकीद** देणेत आली.

**१६)** श्री.पेटारे हे दि.२४-१०-२०१०, दि.३१-१०-२०१०, दि.०३-११-२०१०, दि.०७-११-२०१० ते दि.०८-११-२०१० व दि.१४-११-२०१० ते दि.१७-११-२०१० या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.०१-०१-२०११ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

**१७)** श्री.पेटारे हे दि.२६-०१-२०११, दि.३१-०१-२०११, दि.०१-०२-२०११, दि.१०-०२-२०११ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.०७-०४-२०११ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

**१८)** श्री.पेटारे हे दि.२३-०२-२०११, दि.०४-०३-२०११, दि.०७-०३-२०११, दि.१८-०३-२०११ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.२३-०४-२०११ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

**१९)** श्री.पेटारे हे दि.२५-०४-२०११, दि.०२-०५-२०११, दि.१३-०५-२०११ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.१२-०८-२०११ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

**२०)** श्री.पेटारे हे दि.२३-०५-२०११, दि.२९-०५-२०११, दि.३१-०५-२०११, दि.१२-०६-२०११, दि.१४-०६-२०११ व दि.१६-०६-२०११ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.२५-०८-२०११ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

**२१)** श्री.पेटारे हे दि.२७-०६-२०११, दि.२९-०६-२०११, दि.०१-०७-२०११, दि.०५-०७-२०११, दि.११-०७-२०११, दि.१३-०७-२०११ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.१४-०९-२०११ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **संस्थान सेवेतून दोन दिवस तात्पुरते सेवा निलंबीत करणेत आले.**

**२२)** श्री.पेटारे हे दि.२८-०७-२०११, दि.२९-०७-२०११, दि.०८-०८-२०११ व दि.१०-०८-२०११ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.०८-१०-२०११ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

**२३)** श्री.पेटारे हे दि.२१-०९-२०११, दि.२८-०९-२०११, दि.०२-१०-२०११ ते दि.०८-१०-२०११, दि.१६-१०-२०११, दि.१८-१०-२०११ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.०५-११-२०११ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

**२४)** श्री.पेटारे हे दि.२१-०८-२०११, दि.२४-०८-२०११, दि.३०-०८-२०११, दि.०२-०९-२०११, दि.०७-०९-२०११, दि.०९-०९-२०११, दि.१४-०९-२०११ व दि.१५-०९-२०११ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.०५-११-२०११ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

**२५)** श्री.पेटारे हे दि.२३-१०-२०११, दि.२४-१०-२०११, दि.२६-१०-२०११, दि.०२-११-२०११, दि.०७-११-२०११, दि.०८-११-२०११, दि.१३-११-२०११, दि.१६-११-२०११ व दि.१८-११-२०११ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.२४-१२-२०११ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

**२६)** श्री.पेटारे हे दि.२४-११-२०११, दि.२८-११-२०११ ते दि.३०-११-२०११, दि.०८-१२-२०११, दि.१४-१२-२०११, दि.१५-१२-२०११ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.३०-०१-२०१२ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

**२७)** श्री.पेटारे हे दि.२६-१२-२०११, दि.२८-१२-२०११, दि.२९-१२-२०११, दि.०५-०१-२०१२, दि.०८-०१-२०१२ व दि.०९-०१-२०१२ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.११-०२-२०१२ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

**२८)** श्री.पेटारे हे दि.२३-०१-२०१२, दि.२५-०१-२०१२, दि.०६-०२-२०१२, दि.१०-०२-२०१२ व दि.१५-०२-२०१२ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.१६-०३-२०१२ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **सक्त ताकीद** देणेत आली.

**२९)** श्री.पेटारे हे दि.२१-०२-२०१२, दि.२६-०२-२०१२ ते दि.२८-०२-२०१२, दि.०५-०३-२०१२, दि.०७-०३-२०१२, दि.१५-०३-२०१२ व दि.१८-०३-२०१२ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले. म्हणून त्यांना दि.१७- ०४-२०१२ रोजीचे आदेशान्वये शिक्षा म्हणून **संस्थान सेवेतून एक दिवस तात्पुरते सेवा निलंबीत करणेत आले.**

अशाप्रकारे श्री.पेटारे यांना यापूर्वी गैरशिस्त वर्तनाबाबत **एकुण २९ वेळा** शिक्षा झालेली असून, त्यांचे सेवेत व वर्तनात सुधारणा होत नसल्याचे दिसून येते.

श्री.पेटारे यांचे विरुध्द गैरशिस्त वर्तनाबाबत ठेवणेत आलेल्या आरोपपत्रातील आरोप सिध्द झालेले आहेत. आरोपपत्रातील आरोप शाबीत झालेल्या अथवा दोषी आढळुन आलेल्या कर्मचा-यास गैरशिस्त वर्तनाबाबत दि.बॉम्बे इंडस्ट्रीयल एम्प्लॉयमेंट (स्टॅडींग ऑर्डर्स) रुल्स १९५९ चे कलम २५ (१) अन्वये खालीलप्रमाणे शिक्षा करणेची तरतुद आहे.

**अ) ताकीद** द्यावी किंवा **ठपका** द्यावा.

**ब)** पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट, १९३६ हयाच्या तरतुदींच्या मर्यादेत राहुन आणि त्यानुसार **दंड** करावा. **(एकुण वेतनाचे ३% इतका दंड)**

**क) चार दिवसांपेक्षा जास्त नाही** इतका काळ त्याला व्यवस्थापकाच्या सहीच्या लेखी आदेशाने **सस्पेंड करावे.**

**ड)** नोटीशी शिवाय **बडतर्फ (डिसमीस)** करावे.

सबब, श्री.लक्ष्मण यशवंत पेटारे, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचे विरुध्द ठेवण्यात आलेल्या आरोपपत्रातील आरोप शाबीत झालेले असल्याने, व ते खातेचौकशीत दोषी आढळुन आलेले असल्याने, त्यांना आरोप पत्रात नमुद केलेल्या गैरशिस्त वर्तनाबाबत उपरोक्त नमुद केलेल्या चार शिक्षेपैकी **"ड"** प्रमाने संस्थान सेवेतून नोटीशीशिवाय **कायम स्वरूपी बडतर्फ (डिसमिस)** करणेस मान्यता असावी.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३८५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, .लक्ष्मण यशवंत पेटारे, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचे विरुध्द ठेवण्यात आलेल्या आरोपपत्रातील आरोप शाबीत झालेले असल्याने, व ते खातेचौकशीत दोषी आढळुन आलेले असल्याने, त्यांना आरोप पत्रात नमुद केलेल्या गैरशिस्त वर्तनाबाबत नियमाप्रमाणे प्रथम त्यांचे विरुद्ध ठेवणेत आलेल्या आरोप पत्रातील आरोपांचे गांभिर्य विचारात घेता, त्यांना संस्थानचे सेवेतून बडतर्फ (डिसमीस) का करण्यात येऊ नये अशी सेकंड शो-कॉज नोटीस देण्यात यावी. त्यानंतर श्री.पेटारे यांनी सदर नोटीशीस मुदतीत लेखी खुलासा सादर न केल्यास, अथवा श्री.पेटारे यांनी दिलेला लेखी खुलासा असमाधनकारक आढळून आल्यास श्री .पेटारे यांना उपरोक्त ड प्रमाणे संस्थान सेवेतून नोटीशीशिवाय कायम स्वरूपी बडतर्फ (डिसमिस) करण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही-कामगार अधिकारी)

---

**विषय नं.२७.** **अहमदनगर शहर वाहतुक शिर्डी शहर वाहतुक व शनिशिंगणापूर येथील रहदारी नियंत्रणासाठी, पोलिस विभागाला गृहरक्षक दलातील ८० कर्मचारी द्यावेत व सदर कर्मचाऱ्यांना शासनाकडून आठ तासाकरिता मिळणाऱ्या भत्त्याइतकी रक्कम संस्थानकडुन मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. मा.श्री.संजय बारकुंड, अप्पर पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांनी त्यांचे दिनांक नसलेले पत्रात, वाहतूक कोंडी समस्येवर उपाययोजना करणेकामी गृहरक्षक दलातील कर्मचारी हे गणवेशधारी व शिस्तप्रिय असतात. त्यांना पोलीस दलांतील बंदोबस्त तसेच बाहय कामकाजाबाबत अनुभव असतो. सदर कर्मचाऱ्यांमधुन (१) अहमदनगर शहर वाहतुक ३० कर्मचारी, (२) शिर्डी शहर वाहतुक ३० कर्मचारी, (३) शनिशिंगणापूर येथील रहदारी नियंत्रणासाठी २० कर्मचारी, असे एकुण ८० गृहरक्षक दलातील कर्मचारी दिल्यास रहदारी नियंत्रणाकरीता (ट्रॅफिक वॉर्डन) त्यांचा चांगला उपयोग होईल. श्री साईबाबा संस्थान हे नेहमीच वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबवुन जनतेची सेवा करीत असते. हा उपक्रम हाती घेतल्यास सर्वसामान्य जनतेला सुसाहय होईल, अपघात कमी होतील.

तरी सदरचा उपक्रम संस्थानने हाती घ्यावा तसेच सदर कर्मचाऱ्यांना शासनाकडून मिळणाऱ्या आठ तासांच्या भत्त्याइतकी रक्कम श्री साईबाबा संस्थानकडून मिळावी.छअशी विनंती वजा प्रस्ताव सादर केला आहे.

सन २००४ च्या अधिनियमातील कलम २१ (२) नुसार नोंदणीकृत संस्था व शिर्डी नगरपंचायतीस मा.छाननी समितीच्या शिफासरीनुसार व राज्य शासनाच्या मान्यतेने आर्थिक सहाय्य करणेची तरतुद आहे. सन २००४ च्या अधिनिमात शासनाचे विभागांना आर्थिक सहाय्य करण्याची तरतुद नाही. संदर्भीय प्रस्ताव शासनाचा असल्याने प्रस्तावीत मागणीचा विचार करता येणार नाही.

**निर्णय क्र.३८६** **यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्त प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा करणेकामी मा.श्री.संजय बारकुंड, अप्पर पोलिस अधिक्षक,अहमदनगर यांना व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे आमंत्रित करण्यात यावे, असें ठरलें.** (कार्यवाही-सामान्य प्रशासन,वशी-०६/संरक्षण अधिकारी)

---

**विषय नं.२८.** **प्राथमिक विभागासाठी नेमणूक करण्यात आलेल्या शिक्षण सेवकांचा परिविक्षाधीन कालावधीला दिनांक ०१ सप्टेबर २०१० पासून सलग ०३ वर्षे मान्यता मिळणे बाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१८.०४.२०१० चे सभेत इंग्लिश मिडीयम स्कुलकडे शिक्षणसेवक नेमणूकी बाबत प्रस्ताव ठेवण्यात आला होता. यामध्ये ज्यु. केजी साठी ०२ शिक्षणसेवक, प्राथमिक विभाग इ.१ली ते ४ थी साठी ०३ शिक्षणसेवक व इ. ५वी ते ७ वी साठी ०२ असे एकूण ०७ शिक्षणसेवक नेमणूक करण्यात यावेत असे नमूद करण्यात आले होते. या प्रस्तावास निर्णय क्र. ३८० नुसार मान्यता देण्यात आलेली होती. त्यानुसार दि.१४/०६/२०१० रोजी वर्तमान पत्रात जाहिरात देवून उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले होते . या आलेल्या अर्जाची आस्थापना विभागामार्फत छाननी करुन पात्र उमेदवारांना संस्थानमार्फत पत्र पाठवून लेखी व तोंडी परिक्षेसाठी बोलविण्यात आले .

दि.२०/०८/२००१०रोजीचे झालेल्या मुलाखतीनुसार प्राथमिक विभागासाठी खालीलप्रमाणें शिक्षणसेवकांची ११ महिन्याकरीता नेमणूक करण्यात आली.

| अ.नं. | उमेदवराचे नांव | पदनाम | जात-प्रवर्ग | शैक्षणिक पात्रता | आदेश क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्रीमती निता हिरामण परदेशी | शिक्षणसेवक | हिंदु- धनगर एन.टी. सी. | एच.एस.सी डी.एड. | जा.न.एसएसएस/इं.मि.स्कुल/ ९१४२/२०१० दि.३१.०८.२०१० |
| ०२ | श्रीमती ज्योती अरुण बोधक | शिक्षणसेवक | हिंदु-ख्रिश्चन ओ. बी. सी. | एच.एस.सी डी.टी.एड. | जा.न.एसएसएस/इं.मि.स्कुल/ ९१४६/२०१० दि.३१.०८.२०१० |
| ०३ | श्रीमती सोनिया प्रकाश ठोकळ | शिक्षणसेवक | हिंदु- महार एस. सी. | एच.एस.सी डी.एड. | जा.न.एसएसएस/इं.मि.स्कुल/ ९१४४/२०१० दि.३१.०८.२०१० |
| ०४ | श्री रावसाहेब रामभाउ राशिनकर | शिक्षणसेवक | हिंदु- धनगर एन.टी. सी. | एच.एस.सी डी.एड. | जा.न.एसएसएस/इं.मि.स्कुल/ ९५९५/२०१० दि.२७.०९.२०१० |

मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२६.०३.२०११ निर्णय क्र. २३५ नुसार सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षासाठी उपरोक्त शिक्षण सेवकांना पुर्ननेमणूक देण्या बाबत सुचीत करण्यात आले आहे. त्यानुसार त्यांना नेमणूक पत्र देण्यात आले आहे.

शाळेकडे सध्या उपलब्ध असललेल्या वर्ग / तुकडया तसेच मागील तीन ते चार वर्षापासून वाढती विद्यार्थी संख्या लक्षात घेता. सदर शिक्षणसेवकांची प्रत्येक वर्षी नियमीतपणे आवश्यकता भासणार आहे. तसेच सदरचे शिक्षणसेवक हे जाहिरातीद्वारे व लेखी तोंडी परिक्षा घेवून, मुलाखत घेवून भरलेले आहेत. सध्या हे शिक्षणसेवक संस्थानमध्ये रु. ३०००/- (अक्षरी रुपये तीन हजार मात्र) चे मानधनावर फक्त ११ महिन्याच्या नियुक्तीवर आहेत, प्रत्येक शैक्षणिक वर्षात मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेवून शिक्षण सेवकांना नव्याने नियुक्ती द्यावी लागते. सदर शिक्षण सेवकांना ११ महिन्यांची नेमणूक दिल्याने त्यांचे सेवेत खंड पडल्याचे दिसून येते व यामुळे त्यांचे वार्षिक सेवेचे नुकसान होत असल्याचे दिसून येते.

महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक एसएसएन १०९९/(३४०/९९) माशि-२ दि. १३.आक्टोबर २००० नुसार शिक्षण सेवकाची नेमणूक ३ वर्षासाठी करावयाची आहे. वरील सर्व शिक्षणसेवकांचे काम समाधानकारक असून वाढत्या वर्गसंख्यामुळे त्यांची आवश्यकता आहे. तरी वरील ४ शिक्षणसेवकांना त्यांचे नेमणूकीपासून ३ वर्षासाठी शिक्षणसेवक म्हणून नेमणूक देण्यास हरकत नाही. मान्यतेसाठी सादर

**निर्णय क्र.३८७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, महाराष्ट्र शासन निर्णय क्र.एसएसएन१०९९/(३४०/९९)माशि-२ दि.१३ आक्टोबर २००० नुसार शिक्षण सेवकाची नेमणूक ३ वर्षासाठी करावयाची आहे. वरील सर्व शिक्षण सेवकांचे काम समाधानकारक असून वाढत्या वर्गसंख्यामुळे त्यांची आवश्यकता असल्याने वरील ४ शिक्षणसेवकांना त्यांचे नेमणूकीपासून ३ वर्षासाठी शिक्षणसेवक म्हणून नेमणूक देण्यात यावी,असें ठरलें.** (कार्यवाही-प्राचार्या,इंग्लिश मीडियम स्कुल/अधिक्षक,आस्थापना)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.**

**आयत्या वेळेचा विषय नं.०१.** **पदस्थापना / पदोन्नती देण्यासाठी वर्ग-४ मधील कर्मचाऱ्यांच्या लेखी व प्रात्यक्षिक परिक्षेचे सिलबंद लखोटे उघडून पुढील कार्यवाही करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समिती दि.१९/११/२०११ रोजीच्या सभेत निर्णय क्र.७६५/३, १३,१४,१५,१६,१७,२० नुसार प्रामुख्याने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.

घ्शासनाकडून सेवाप्रवेश नियमास मिळणाऱ्या मान्यतेच्या अधीन राहून मंजूर कर्मचारी आकृतीबंधानुसार विविध रिक्त पदांवर पात्र कर्मचाऱ्यांना पदस्थापना / पदोन्नती देणेकामी परिक्षेचे आयोजन करण्यासाठी सल्लागार म्हणून श्री.प्रशांत खंबसवाडकर, नासिक यांची नियुक्ती करण्यात यावी. तसेच पदनिहाय रिक्त पदांवर पदोन्नती देण्यासाठी मा.ना.राधाकृष्ण एकनाथराव विखेपाटील, मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे, मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व मा.श्री.अशोक भिमाशंकर खांबेकर या पाच सदस्यांची समिती गठीत करण्यात येत असून या समितीसमोर परिक्षेची कार्यवाही करण्यात येऊन कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात यावी.

त्यानुसार मा.विश्वस्त श्री.शैलेश कुटे व सल्लागार मा.श्री.प्रशांत खंबसवाडकर, नासिक यांचे उपस्थितीत दि.२६/०२/२०१२ रोजी लिपीक - टंकलेखक, कुपन विक्रेता, दूरध्वनी चालक, तारतंत्री व इतर तांत्रिक पदांसाठी एकूण-११० वर्ग-४ कर्मचाऱ्यांच्या लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात आलेल्या आहेत.

तसेच मा.व्यवस्थापन समिती दि.१९/११/२०११ निर्णय क्र.७६५ (४) मधील निर्णयानुसार यापुर्वी अनुत्तीर्ण झालेले लिपीक-टंकलेखक-१२ व दुरध्वनी चालक-३ एकूण १५ कर्मचाऱ्यांच्याही याच दिवशी लेखी व प्रात्यक्षिक परिक्षा घेण्यात आलेल्या आहेत.

लेखी व प्रात्यक्षिक परिक्षा घेतल्यानंतर वरीलप्रमाणे एकूण (११०+१५) १२५ कर्मचाऱ्यांच्या उत्तरपत्रिका तपासून गुणपत्रकांची यादी तयार करण्यात आलेली आहे. संबंधीत सर्व कागदपत्रे लखोटयात सिलबंद करण्यात आलेली आहेत.

यापूर्वी परिविक्षाधीन कालावधीसाठी विविध पदांवर पदस्थापना केलेल्या कर्मचाऱ्यांच्या दि.१४/११/२०१० रोजी लेखी व प्रात्यक्षिक परिक्षा घेण्यात आलेल्या होत्या. मा.व्यवस्थापन समिती दि.१९/११/२०११ रोजीचे सभेतील निर्णयानुसार सदर परिक्षेमध्ये ज्या कर्मचाऱ्यांना लेखी परिक्षेत ३५% गुण व प्रात्यक्षिक परिक्षेत ४०% गुण मिळाले असे सर्व कर्मचारी उत्तीर्ण समजण्यात येऊन त्यांना संबंधीत पदावर संस्थान सेवेत कायम करण्यात आलेले आहे. त्यानुसार खालील बाबींवर निर्णय होणेस विनंती.

१) अंतिम निकालपत्र तयार करणेकामी सिलबंद लखोटे उघडणेस मान्यता मिळणेस विनंती.

२) यापुर्वीचे निकषानुसार उत्तीर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना रिक्त पदे, Merit (एकूण गुण), लगतच्या पाच वर्षाचे गोपनीय अहवाल, प्रस्तावीत भरती नियम (Recruitment Rule) वगैरे बाबी विचारात घेऊन संबंधीत कर्मचाऱ्यांना ज्या त्या पदावर पदस्थापना / पदोन्नती देणेबाबतचे विषयावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३८८** **आजचे सभेत अंतिम निकालपत्र तयार करणेकामी दिनांक २६.०२.२०१२ रोजी घेण्यात आलेल्या लेखी व प्रात्यक्षिक परिक्षेचे सिलबंद लखोटे समक्ष उघडण्यात आले. यापुर्वीचे निकषानुसार उत्तीर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना रिक्त पदे, Merit (एकूण गुण), लगतच्या पाच वर्षाचे गोपनीय अहवाल, प्रस्तावीत भरती नियम (Recruitment Rule) वगैरे बाबी विचारात घेऊन संबंधीत कर्मचाऱ्यांना ज्या त्या पदावर पदस्थापना/ पदोन्नती देणेसाठी प्रस्ताव तयार करुन मान्यतेसाठी पुढील सभेपुढे ठेवण्यात यावा,असें ठरलें.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२.** **ज्यु.के.जी. प्रवेश प्रक्रिया सन २०१२-१३ बाबत**

**प्रस्ताव-** सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षात ज्यु.केजी प्रवेश संदर्भात दि. ०६.०४.२०१२ रोजी मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे विचारार्थ विषय ठेवण्यात आला होता. ज्यु. के.जी साठी मर्यादीत २४० प्रवेश देण्याचे ठरले होते. यामध्ये ३.३ ते ३.६ असा वयोगट ठेवण्यात आलेला होता परंतू या वयोगटात मर्यादीत कोठा पूर्ण न झाल्यास त्यापुढील ३.७ ते ४.०० पर्यंत मुलांना प्रवेश देण्यात यावा असे ठरले होते. परंतू दिलेला मर्यादीत कोठा पूर्ण न झाल्याने त्यापुढील ४.१ ते ४.३ वयोगटातील मुलांना प्रवेश देण्यात आलेला आहे. याबाबत तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे आहे.

**एकुण फॉर्म विक्री :- २९२** **एकुण जमा फॉर्म :- २८१**

| वयोगट | वयात बसलेले | प्रवेश पूर्ण | प्रवेश अदयाप बाकी |
|---|---|---|---|
| ३.३ ते ४.०० | २०६ | २०० | ०६ |
| ४.१ ते ४.३ | ३६ | ३३ | ०३ |
| एकूण | २४२ | २३३ | ०९ |

उपरोक्तप्रमाणे दि.२६.०४.२०१२ अखेर २३३ प्रवेश पूर्ण झालेले असून प्रवेश घेणे बाकी असलेल्या पालकांशी प्रवेशाबाबत चर्चा केली असता ०५ पालक प्रवेश घेणार आहेत. या ५ पालकांनी प्रवेश घेतला तर आपली संपूर्ण प्रवेश संख्या ही २३८ होईल.

काही पालकांनी ज्यु. के.जी करीता प्रवेशाबाबत मागणी केलेली असून ३.३ ते ४.३ या वयोगटात बसणारी विद्यार्थी संख्या ही एकूण २२ आहे या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला तर एकूण २६० इतकी संख्या होईल. आजमितीस एकूण ज्यु. के.जीच्या ६ तुकडया करावयाच्या असून प्रत्येक तुकडीत ४० विद्यार्थी संख्या मर्यादीत ठेवण्यात आलेली आहे. परंतू यामध्ये वाढ करावयाची असल्यास एक तुकडीत ४५ विद्यार्थी याप्रमाणे वाढ करणेस हरकत नाही असे नम्र मत आहे परंतू वयोगट ३.३ ते ४.३ पर्यंतच मर्यादीत ठेवावा जेणेकरुन भविष्यात अडचण येणार नाही. तरी याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र. ३८९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-प्राचार्या, इंग्लिश मिडीयम स्कुला)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३.** **प्राथमिक सहा.शिक्षक वेतनश्रेणीबाबत**

**प्रस्ताव-** श्रीसाईबाबा कन्या विद्या मंदिर या विद्यालयाकडे श्री.अजिंक्यदेव रामचंद्र गायकवाड हे प्राथमिक विभागाकडे (इ.५वी ते ७वी गट) सहा.शिक्षक म्हणून कार्यरत असुन, त्यांना खालीलप्रमाणे नेमणूक आदेश देण्यांत आलेले होते.

| अ.क्र. | नेमणुक आदेश क्रमांक | पदनाम | कालावधी |
|---|---|---|---|
| ०१ | जा.क्र.एसएसएस/वशी-१/१६९८/०५<br>दिनांक ३१/०७/२००५ अन्वये | **शिक्षणसेवक**<br>(प्राथमिक) | कामावर हजर झाल्याच्या तारखेपासून दि.३०/०४/२००६ अखेर<br>**०१ शैक्षणिक वर्षाच्या कालावधीकरीता** |
| ०२ | जा.क्र.एसएसएस/वशी-०१/१६७२ /२००६ | **शिक्षणसेवक**<br>(प्राथमिक) | कामावर हजर झाल्याच्या तारखेपासून दि.३०/०४/२००९अखेर<br>**०३ शैक्षणिक वर्षाच्या कालावधीकरीता** |

माध्यमिक शाळा संहिता भाग ८ वा महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांकः एसएसएन १०९९/(३४०/९९) माशि-२ मंत्रालय विस्तार भवन, मुंबई दिनांक १३ ऑक्टोबर, २००० अन्वये पृष्ठ क्रमांक ५०४ अ.क्र. (८) नियमाप्रमाणे शिक्षणसेवक या पदावर तीन शैक्षणिक वर्षे अथवा तीस महिने समाधानकारक काम केल्यानंतर संबंधित उमेदवाराला शिक्षकाच्या नियमित पदावर नियमित वेतनश्रेणीत नियुक्ती देण्यांत येईल. तसेच सुरुवातीला एक वर्षाकरिता शिक्षणसेवक पदावर नेमणूक केल्यानंतर पुन्हा त्याच शिक्षण सेवकाची नियुक्ती करावयाचाी झाल्यास त्याची पूर्वीची सेवा विचारात घेतली जावी.

परंतु श्री.गायकवाड यांची सुरुवातीस एक शैक्षणिक वर्षाच्या कालावधीकरीता नेमणूक केलेली होती. दुस-यांदा दिलेल्या नेमणूक आदेशामध्ये प्रथम दिलेला ०१ वर्ष कालावधीचा नेमणूक आदेश गृहित धरण्यांत न आल्याने त्यांना जादा एक वर्ष शिक्षणसेवक या पदावर काम करावे लागले. अ.नं.०१ चा आदेश हा फक्त एक शैक्षणिक वर्षाकरिता दिलेला होता. शिक्षणसेवक नियमात तो नसल्याने त्याबाबत आस्थापना विभागाकडे दूरध्वनीद्वारे चर्चा केलेली होती. तेव्हा नेमणूक आदेश एक वर्षाकरिता देण्याचे ठरले आहे,असें सांगण्यात आले. तद्नंतर अ.नं.०२ नुसार विहित शासन नियमानुसार सलग ३ वर्षाकरिता शिक्षणसेवक नेमणूक आदेश देण्यात आलेला आहे. त्यामुळे श्री.गायकवाड यांना शिक्षणसेवक कालावधी ०४ वर्षांचा पूर्ण करावा लागला.

दुस-यांदा दिलेल्या नेमणूक आदेशाचा शिक्षणसेवक या पदाचा कालावधी दिनांक ३०/०४/२००९ रोजी संपल्याने शासन नियमानुसार माहे मे-२००९ पासून सहाय्यक शिक्षक नियमित वेतनश्रेणीत आदेश देण्याबाबत शिफारस केली होती. त्यानुसार दिनांक ०१/०५/२००९ पासून श्री.गायकवाड यांची सहा.शिक्षक (प्राथमिक) या पदावर (वेतनश्रेणी रुपये ४५००-१२५-७०००) नियुक्ती करण्यांत आली. सदर सेवा विनाखंड आहे.

त्यांना नियमानुसार ०१ मे २००८ पासून सहा.शिक्षक (प्राथमिक) या पदाची वेतनश्रेणी देय होत आहे. परंतु ती वेतनश्रेणी त्यांना ०१ मे २००९ पासून दिलेली असल्याने ती वेतनश्रेणी त्यांना शिक्षणसेवक कालावधी नियमानुसार मे २००८ पासून देय होत आहे.

**निर्णय क्र.३९०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.अंजिक्यदेव रामचंद्र गायकवाड यांना नियमानुसार ०१ मे,२००८ पासून सहाय्यक शिक्षक (प्राथमिक) या पदाची वेतनश्रेणी देण्यात यावी,असें ठरलें.**

(कार्यवाही-प्राचार्या,कन्याशाळा /अधिक्षक,आस्थापना)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०४** **सहा.शिक्षक वेतनश्रेणी मिळणे बाबत**

**प्रस्ताव-** श्रीसाईबाबा कन्या विद्या मंदिर या विद्यालयाकडील इयत्ता ८ वी ते १० वी (माध्यमिक विभागासाठी) श्री देशमुख विजयकुमार पांडुरंग यांची जा.क्र.एसएसएस/वशी-०१/९७३६/२००८ दिनांक ०३/०८/२००९ अन्वये शिक्षणसेवक म्हणून कामावर हजर झाल्याच्या तारखेपासून ते दिनांक ३०/०४/२०१२ या ०३ शैक्षणिक वर्षांच्या कालावधीसाठी दरमहा रुपये ४,०००/-इतक्या मानधनावर नेमणूक करण्यांत आलेली होती.

सदर शिक्षणसेवक माध्यमिक शाळा संहिता भाग ८ वा महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांकः एसएसएन १०९९/(३४०/९९) माशि-२ मंत्रालय विस्तार भवन, मुंबई दिनांक १३ ऑक्टोबर, २००० अन्वये पृष्ठ क्रमांक ५०४ अ.क्र. (८) नियमाप्रमाणे ०३ वर्ष कालावधी दिनांक ३०/०४/२०१२ अखेर पूर्ण होत असल्याने, त्यांना शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून सहा.शिक्षक (माध्यमिक) वेतनश्रेणी रुपये ९३००-३४८०० देय होत आहे. श्री देशमुख हे इ.९ वी व इ.१० वी या वर्गास इंग्रजी हा विषय चांगल्या प्रकारे शिकवित असून गुणांची टक्केवारी देखील चांगली आहे त्यामुळे सदरचे वेतनश्रेणीस ते पात्र होत आहे. त्यांचे काम समाधानकारक आहे. त्यांना सदर वेतनश्रेणी देणेस हरकत नाही.

श्री.देशमुख व्ही.पी. यांना शैक्षणिक वर्ष माहे मे २०१२ पासून_सहा.शिक्षक (माध्यमिक) वेतनश्रेणी देय होत आहे.

**निर्णय क्र. ३९१** **यावर सविस्तर चर्चा होऊन,श्री.देशमुख विजयकुमार पांडूरंग यांना शैक्षणिक वर्ष माहे मे,२०१२ पासून सहाय्यक शिक्षक (माध्यमिक) रुपये ९३००-३४८०० वेतनश्रेणीत नेमणूक देण्यात यावी असें ठरलें.**

(कार्यवाही-प्राचार्या,कन्या विद्या मंदिर)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०५** **श्री साईलीला इंग्रजी आंतरराष्ट्रीय स्वागत अंक विदेशात पाठविणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ च्या कलम नं. १७ ठ मध्ये "श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालविल व त्याचा विस्तार करील "अशी तरतुद आहे.

या तरतूदीनुसार विदेशात श्री साईबाबांचे जीवन कार्याचा प्रचार- प्रसार व्हावा म्हणून मा.व्य.समिती सभा दि.२४.०९.२०११ निर्णय क्र.७५५ अन्वये आंतरराष्ट्रीय साईलीला इंग्रजी मासिक चालू करण्याचे ठरले असून, सदर मासिकाचे संपादनासाठी मा.श्री. रघुनाथ रेड्डी, तिरुपती यांची मानद संपादक म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

मा.व्य.समिती सभा दि.१९.०२.२०१२ निर्णय क्र.२३८ नुसार सदर मासिकाच्या स्वागत अंकांची छपाई मे.टॅको व्हीजन्स् प्रा.लि., मुंबई यांचेकडून प्रती अंक रु.१०८/- दराने करुन घेणेबाबतच्या निर्णयानुसार छपाईकामी येणा-या रु.२१,६०,०००/- चे खर्चास तसेच पॅकींग फॉरवर्डीग खर्च प्रत्यक्ष जो येईल तो आदा करणेस मान्यता आहे.

त्यानुसार मे.टॅको व्हीजन्स् प्रा.लि., मुंबई यांना इकडील जा.नं.६१९३ दि.१०.०३.२०१२ अन्वये २०,००० प्रती छपाईचा कार्यादेश देण्यात आला आहे. कार्यादेशाप्रमाणे २०,००० स्वागत अंकांची पूर्ण छपाई झालेली असून, मुंबई कार्यालयाकडे अंक जमा झाले आहेत.

आंतरराष्ट्रीय साईलीला इंग्रजी मासिक नव्यानेच सुरु होत आहे. साईभक्तांनी अधिकाधिक संख्येने सदर मासिकाचे सभासदत्व घ्यावे (Subscription) असे आवाहन स्वागत अंकात केले असून, पुढील नियमीत द्वैमासिक अंकांची वार्षिक वर्गणी वगैरे बाबत माहिती देणेत आली आहे. अशा प्रकारचे मासिक संस्थान सुरु करीत आहे हे विदेशातील सर्व साईभक्तांना विदीत व्हावे म्हणून सदर स्वागत अंक विदेशात विनामुल्य वितरीत करावे लागतील असे श्री रेड्डी यांनी सुचविले आहे. त्यातील आवाहानानुसार होणा-या सभासदांचे संख्येवरुन पुढील नियमित द्वैमासिकांची छपाई करणे शक्य होईल. तथापि सदर स्वागत अंक विदेशात विनामुल्य वितरीत करावे याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयात उल्लेख आलेला नाही. श्री रघुनाथ रेड्डी, तिरुपती,मानद संपादक यांनी दि.२४.०३.२०१२ चे इमेल अन्वये खालील नमुद केलेप्रमाणे यादीनुसार विदेशात अंक पाठवावे असे कळविले आहे.

| अ.नं. | विदेशातील साईमंदिराचे प्रतिनिधीचे नाव | देश | अंकांची संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री प्रदिप रुपापनगुडी | मेलबॉर्न ऑस्ट्रेलीया | १००० | |
| ०२ | श्री. अमर अलुरी | मेलबॉर्न ऑस्ट्रेलीया | १०० | |
| ०३ | श्री.मनोज मनसुखानी | मेलबॉर्न ऑस्ट्रेलीया | २०० | |
| ०४ | जॅक तोलाणी | ऑस्ट्रेलीया | १००० | |
| ०५ | व्यंकटराव विष्णमोलाकाला | ऑस्ट्रलिया | ३०० | |
| ०६ | अनिता कन्डुकुरी | ऑस्ट्रलिया | १०० | |
| ०७ | विदोषी जना | ऑस्ट्रेलीया | १०० | **२८००** |
| ०८ | श्रीराज | युनायटेड किंगडम | २००० | **२०००** |
| ०९ | भास्कर रेड्डी धुव्वुरु | न्युझीलंड | ११०० | **११००** |
| १० | एस.पी.कन्नन | मलेशिया | ३००० | **३०००** |
| ११ | शम्मी चोप्रा | कॅनडा | १५०० | |
| १२ | प्रभात चतुर्वेदी | कॅनडा | २०० | |
| १३ | साई ईश्वरी | कॅनडा | ५० | |
| १४ | सुहास गोडखिंडी | कॅनडा | ५०० | |
| १५ | इतिकाला | कॅनडा | ३० | **२२८०** |
| १६ | आशा मंजूनाथ | बहारिन | ३० | **३०** |
| १७ | मुकूंदराज | युएसए | १००० | |
| १८ | रवि गणसंबधम | युएसए | २०० | |
| १९ | शिर्डी साई सेंटर - न्युयार्क | युएसए | १०० | |
| २० | शिर्डी साईबाबा टेंपल फ्लोरिडा | युएसए | १०० | |
| २१ | श्रीधर रंगास्वामी - ओरलॅन्डो | युएसए | १०० | |
| २२ | रश्मी शिवशंकर- अलबॅनी | युएसए | १०० | |
| २३ | साईमंदिर | युएसए | १०० | |
| २४ | शिर्डी साईबाबा मंदिर एऊरोरा शिकागो | युएसए | १०० | |
| २५ | साईबाबा मंदिर मिनेॲपोलिस | युएसए | १०० | |
| २६ | शिर्डी साईबाबा मंदिर दलास | युएसए | १०० | |
| २७ | श्री साई सेंटर ब्रुन्सविक | युएसए | १०० | |
| २८ | शिर्डी साई टेम्पल मिचीगन | युएसए | १०० | |
| २९ | शिर्डी साई टेम्पल पिटसबर्ग | युएसए | १०० | |
| ३० | शिर्डी साई कलचर ॲन्ड कम्युनिटी सेंटर इसेलिन | युएसए | १०० | |
| ३१ | शिर्डी साई टेम्पल- मिडलटाऊन | युएसए | १०० | |
| ३२ | शिर्डी साई मंदिर - डुलेस | युएसए | १०० | |
| ३३ | शिर्डी साई टेम्पल नॉर्थ अमेरिका ॲटलंटा | युएसए | १०० | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३४ | शिर्डी साई परिवार न्यु.इंग्लंड चेम्सपोर्ट | युएसए | १०० | |
| ३५ | शिर्डी साई दरबार सनिवेल | युएसए | १०० | |
| ३६ | शिर्डी साई स्पीरिटेल सेंटर सॅन्डडीओ | युएसए | १०० | |
| ३७ | शिर्डी साई टेम्पल सोसायटी डब्लींग | युएसए | १०० | |
| ३८ | शिर्डी साईबाबा संस्थान लॉस एन्जल्स | युएसए | १०० | |
| ३९ | शिर्डी साई परिवार मिलपिटस | युएसए | १०० | |
| ४० | शिर्डी साईबाबा टेम्पल टेक्सॉस | युएसए | १०० | **३४००** |
| ४१ | श्री रघुनाथ रेड्डी - मानद संपादक | तिरुपती | २००० | याबाबत निर्णय होणेस विनंती. |
| | | **एकूण अंक** | **१६६१०** | **१४६१०** |

उपरोक्त यादीनुसार विदेशात पाठविणेकामी आवश्यक अंक १४६१० नग
श्री रघुनाथ रेड्डी, तिरुपती, मानद संपादक यांची मागणी २००० नग

-----------------------

**एकूण अंक १६,६१० नग**

-----------------------

एकूण छपाई झालेले २०००० नग अंकांपैकी १६,६१० अंक दिल्यास ३,३९० अंक शिल्लक राहतील.

उपरोक्त टिपणीच्या अनुषंगाने खालील बाबींवर निर्णय होणेस विनंती.

१) श्री साईलीला आंतरराष्ट्रीय इंग्रजी स्वागत अंक विदेशात विनामुल्य वितरीत करणेबाबत निर्णयार्थ सादर.

२) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१९.०१.२०१२ निर्णय क्र.२३८ अन्वये २०,००० अंकांची छपाई खर्चास तसेच अंकांची पॅकींग व फॉरवर्डीग खर्च प्रत्यक्ष जो येईल तो आदा करणेस मान्यता आहे. अंक विदेशात हवाई मार्गाने अथवा सागरी मार्गाने पाठविणेसाठी प्रती अंक सरासरी रु.२००/- दराने अंदाजे १५,०००अंक पाठविणेस रु.३०,००,०००/- (अक्षरी रुपये तीस लाख) मात्र खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च एक अंक पाठविणेचा गृहीत धरला आहे.अंक एकत्रीत (Bulk quantity) पाठविलेस खर्च कमी होईल. विदेशात माल पाठविणा-या एजन्सीज कडून दरपत्रके घेऊन निम्नतम दरधारकाकडून काम करुन घेणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.३०,००,०००/- चे खर्चास मान्यता असावी.

३) श्री रघुनाथ रेड्डी, तिरुपती, मानद संपादक यांनी तिरुपती संस्थानचे विश्वस्तांना तसेच दर्शनासाठी येणा-या अती महत्वाचे व्यक्तिंना सप्रेमभेट देणेकामी २०००अंकांची मागणी केली आहे. त्यांना २००० अंक द्यावे किंवा कसे याबाबत निर्णय होणेस विनंती.

४) श्री रघुनाथ रेड्डी, तिरुपती, मानद संपादक यांनी दूरध्वनीवरुन कळविले आहे की, स्वागत अंकातील लेख डिसेंबर २०११ व जानेवारी २०१२ या कालावधीत शिरडी मंदिर तसेच विदेशातील साई मंदिरे याठिकाणी झालेले कार्यक्रमावर आधारीत असल्याने अंकांचे लवकर विमोचन व्हावे अन्यथा लेख कालबाह्य होतील.

तरी स्वागत अंकांचे लवकर विमोचन होणेबाबत निर्णयार्थ सादर.

उपरोक्त १ ते ४ बाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र. ३९२ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित केलेप्रमाणे विदेशातील साई मंदिरांना श्री साईलीला इंग्रजी आंतरराष्ट्रीय स्वागत अंक विनामुल्य वितरीत करणेकामी कार्यवाही करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.३० लाख मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली.**

**तसेच, श्री.रघुनाथ रेड्डी, मानद संपादक यांना २००० अंक विनामुल्य देणेबाबत व अंकांचे विमोचनाबाबत निर्णयार्थ पुढील सभेत विषय ठेवावा, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

वरील निर्णय क्र. ३६० ते ३९२ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| (किशोर मोरे) | (डॉ.संजीवकुमार) | (जयंत कुलकर्णी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |